दैनिक

# प्रवक्ता लोकशाहीचा

PRAVAKTA LOKSHAHICHA

मुख्य संपादक - नितीन रावण मुजमुले, मो.नं.९६७३२१०४३८

**Email :-** pravaktalokshahicha@gmail.com **Web :-** https://pravaktalokshahicha.com

■ बीड (महाराष्ट्र) ■ दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०१ ■ अंक - २७१ ■ शुक्रवार दि. १२ जून २०२६ ■ आरएनआय - एमएचएमएआर/२५/ए२३६९ ■ किंमत २ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily ■ Marathi ■ Year - 01 ■ Issue - 271 ■ Friday Dt. 12 June 2026 ■ RNI: MHMAR/25/A2369 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

# काँग्रेसच्या छताखाली विरोधक एकत्र?

# राष्ट्रवादीकडून विलिनीकरणाची ऑफर

## तृणमूलमध्ये फुटीची चिन्हे; ममता बॅनर्जींचे डॅमेज कंट्रोल सुरू

### भाजपविरोधी रणनीतीला नवे वळण; इंडिया आघाडीत मोठ्या राजकीय घडामोडी

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

देशाच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडवून आणणाऱ्या घडामोडींना वेग आला असून, प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेसच्या नेतृत्वाखाली एकत्र येण्याच्या हालचाली सुरू झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्याच्या पार्श्वभूमीवर आता शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही काँग्रेसमध्ये विलिनीकरणाची तयारी दर्शवल्याची माहिती वरिष्ठ सूत्रांकडून समोर आली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, पुढील काही दिवसांत राष्ट्रवादी काँग्रेसकडून या संदर्भात ठोस पावले उचलली जाऊ शकतात. गेल्या दीड वर्षापासून शरद पवार गटाने अजित पवार यांच्या राष्ट्रवादीशी पुन्हा एकत्र येण्याचा प्रयत्न केला होता. अजित पवार यांनीही त्यांच्या अखेरच्या काळात विलिनीकरणाच्या दिशेने सकारात्मक भूमिका घेतल्याचे सांगितले जाते. मात्र, त्यांच्या अपघाती निधनानंतर पक्षातील काही वरिष्ठ नेत्यांनी विलिनीकरणास विरोध दर्शवल्याने दोन्ही राष्ट्रवादींचे मनोमीलन होऊ शकले नाही.

यामुळे शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे भवितव्य काय, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसमध्ये विलिनीकरणाचा पर्याय पक्षातील अनेक प्रमुख नेत्यांना योग्य वाटत असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. दरम्यान, भाजपविरोधी इंडिया आघाडीची काही दिवसांपूर्वी नवी दिल्लीत बैठक झाली होती. या बैठकीत विविध विरोधी पक्षांचे प्रमुख नेते उपस्थित होते. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची स्वतंत्र भेट घेतल्याची माहिती



आहे. या भेटीत राष्ट्रवादी काँग्रेसने विलिनीकरणासाठी तयारी दर्शवित काही अटीही राहुल गांधी यांच्यासमोर ठेवल्याचे सांगितले जाते. याआधीही राहुल गांधी यांच्याशी याबाबत चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

भाजपच्या वाढत्या राजकीय प्रभावाला रोखण्यासाठी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली एकत्र येण्याचा निर्धार अनेक प्रादेशिक पक्षांनी केला असल्याचे चित्र दिसत आहे. भाजपच्या विस्तारवादी राजकारणामुळे प्रादेशिक पक्षांसमोर अनेक अडचणी निर्माण होत असल्याची टीका विरोधकांकडून सातत्याने केली जाते. आपल्या पक्षातील नेते आणि कार्यकर्त्यांचे राजकीय भवितव्य सुरक्षित ठेवण्यासाठी तसेच भविष्यातील राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी काँग्रेसमध्ये विलिनीकरणाचा पर्याय स्वीकारला जात असल्याचे बोलले जात आहे.

दुसरीकडे, पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसमध्येही अंतर्गत संघर्ष तीव्र झाल्याचे समोर आले आहे. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर पक्षातील असंतोष वाढला असून, जवळपास ६० आमदार ममता बॅनर्जींपासून दूर गेल्याची चर्चा आहे. काही खासदारही बंडाच्या तयारीत असल्याचे सांगितले जात आहे. महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींप्रमाणेच पश्चिम बंगालमध्येही पक्षफुटीचा पॅटर्न दिसून येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर ममता बॅनर्जी यांनी तातडीने डॅमेज कंट्रोल सुरू केले आहे. त्यांनी निकटवर्तीय आमदारांशी चर्चा करत काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाशी संपर्क साधल्याचे वृत्त आहे. इंडिया आघाडीच्या बैठकीत त्यांनी सोनिया गांधी यांना दिलेली मिठी देशभर चर्चेचा विषय ठरली होती. तृणमूलमधील वाढत्या असंतोषानंतर अभिषेक बॅनर्जी यांनी राहुल गांधी यांच्याशी चर्चा करून काँग्रेसमध्ये विलिनीकरणाची इच्छा व्यक्त केल्याची माहितीही सूत्रांकडून देण्यात येत आहे.

एकूणच, आगामी काळात भाजपविरोधी राजकारण अधिक मजबूत करण्यासाठी विरोधी पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर पुनर्रचना आणि राजकीय समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता निर्माण झाली असून, देशाच्या राजकारणाला नवे वळण मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

#### राष्ट्रवादीचे नेते राहुल गांधींना भेटले

भाजपविरोधी इंडिया आघाडीची काही दिवसांपूर्वी नवी दिल्लीत बैठक झाली. या बैठकीनिमित्त सर्वच प्रमुख पक्षांचे राजकीय नेते उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेतली. या भेटीत राष्ट्रवादी विलिनीकरणास तयार असल्याचे सांगत काही अटी त्यांच्यापुढे ठेवल्याची माहिती आहे. त्याआधीही राहुल गांधी यांची भेट घेऊन विलिनीकरणासंबंधी चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

#### विलिनीकरणाचा ट्रेण्ड का?

काँग्रेसच्या छताखाली एकत्र येऊन भाजपविरोधी राजकारणाला गती देण्याचा निर्धार प्रादेशिक पक्ष करीत आहेत. भाजपच्या विस्तारवादी राजकारणाच्या पॅटर्नमध्ये प्रादेशिक पक्षासमोरील अडचणी दिवसेंदिवस वाढत आहेत. भारतीय जनता पक्षाकडून प्रादेशिक पक्षांच्या नेतेमंडळींच्या वाटेत काटे पेरले जात असल्याची टीका नेहमी होते. त्यामुळेच आपल्या पक्षातील नेतेमंडळींचे भवितव्य सुरक्षित करण्यासाठी काही वाटाघाटी करून वा प्रमुख अटी शर्ती घालून काँग्रेसमध्ये विलिनीकरणास पक्ष तयार होत आहेत.

#### तृणमूल काँग्रेसकडूनही विलिनीकरणाचा प्रस्ताव

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीत सपाटून मार खाल्ल्यानंतर ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. ममता बॅनर्जी यांच्यापासून पक्षाचे जवळपास ६० आमदार दूर गेले. तसेच तृणमूलचे काही खासदारही त्यांच्यापासून फारकत घेऊन बंडाचे निशाण फडकावण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महाराष्ट्र पॅटर्नप्रमाणे पश्चिम बंगालमध्येही तोच पॅटर्न अंमलात जाणला जाणार असल्याचे तृणमूलच्या नेत्यांनी सांगितले. पक्ष दुभंगलेला असताना ममता बॅनर्जी यांनी तत्काळ डॅमेज कंट्रोलचा प्रयत्न केला. त्यांनी निकटच्या आमदारांशी बोलून काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाशी चर्चा केली. इंडिया आघाडीच्या बैठकीत त्यांनी सोनिया गांधी यांना मारलेली मिठी संपूर्ण देशभरात चर्चेचा विषय ठरला. तृणमुलच्या फुटीनंतर अभिषेक बॅनर्जी यांनी राहुल गांधी यांच्याशी केलेल्या चर्चेत विलिनीकरणाची इच्छा व्यक्त केल्याचे सांगितले जाते.

## किराणा दुकानदारावर भरदिवसा हल्ला; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**माजलगाव । प्रतिनिधी**




माजलगाव शहरातील चिंचगव्हाण परिसरात किराणा दुकान चालवणाऱ्या युवकावर तिघांनी मिळून हल्ला केल्याप्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेत युवक गंभीर जखमी झाला असून त्याच्या हाताला फ्रॅक्चर झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रमोद नवनाथ जोगडे (वय २२, रा. चिंचगव्हाण, ता. माजलगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वैभव अनिल भिसे , आदर्श बाबुराव गायकवाड आणि रितेश विष्णू गायकवाड यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, १० जून रोजी दुपारी सुमारे १२.१५ वाजण्याच्या सुमारास प्रमोद जोगडे हे त्यांच्या किराणा दुकानात असताना तिन्ही आरोपी दुकानात आले. कोणतेही कारण नसताना आरोपींनी शिवीगाळ करत बेल्टने मारहाण केली. तसेच डोक्यावर, पाठीवर व हातावर मारहाण केल्याने फिर्यादी गंभीर जखमी झाले. या मारहाणीत त्यांच्या उजव्या हाताला फ्रॅक्चर झाल्याचे वैद्यकीय तपासणीत निष्पन्न झाले आहे.

घटनेनंतर जखमी युवकावर माजलगाव येथील रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना बीड येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले होते. उपचारानंतर फिर्यादीने माजलगाव शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३ च्या कलम ११८(१), ११७(२), ११५(२), ३५२ व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत. दुकानात घुसून झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात खळबळ उडाली असून आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## बीडला आमदार आहे का?

**बीड । प्रतिनिधी**

नगरपरिषद हद्दीतील धानोरा रोड ते जुना सराटा रोड ' अंकुश नगर या भागातील जाणारा जुना जाता रोड हा कित्येक दिवसापासून नादुरुस्त असून या रोडला आमदाराने मोटरसायकलवर एक चक्कर मारावी म्हणजे कळेल त्या रस्त्याला दोन्ही बाजूचे नाल्या नसल्यामुळे पावसाचे पाणी आणि सांडपाणी हे पूर्ण रस्त्यावर आल्यामुळे जागोजागी खड्डे पडून घाण पाणी साच ते त्यामुळे त्या रस्त्यावर खड्डे होता आणि पाणी साचल्यामुळे मच्छर होतात आणि त्यापासून आरोग्यास धोका निर्माण होतो.

या अंकुश नगर वस्तीमध्ये वीस एक हजार लोकसंख्या आहे त्यामुळे जा करणारांना फार त्रास होतो आणि शाळेतील मुलं मुली वयोवृद्ध यांना त्रास होतो. आणि या खात्यामुळे खराब रस्त्यामुळे आणि नाले नसल्यामुळे इकडील रहिवाशांचे मणके खराब व्हायला लागले या सर्व समस्या दूर करण्यासाठी आमदारांनी लक्ष देण्याची गरज आहे. अंकुश नगर या भागातील सर्व जनतेची आमदारांना विनंती आहे की आपण लक्ष देऊन हा रोड सिमेंट रोड आणि दुतारफा नाली बांधकाम करण्यात यावे अशी सर्व जनतेची इच्छा आहे, अशी सर्व जनतेतून मागणी आहे.

## बनावट रॉयल्टीच्या आधारे अवैध वाळू वाहतूक; हायवा मालकास अटक

**माजलगाव । प्रतिनिधी**

अवैध वाळू वाहतूक करून बनावट रॉयल्टी सादर केल्याप्रकरणी माजलगाव शहर पोलिसांनी हायवा मालक व चालकाविरुद्ध वाळू चोरी, फसवणूक आणि सार्वजनिक मालमतेचे नुकसान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून हायवा मालकास अटक करण्यात आली आहे. या कारवाईत सुमारे २० लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी (दि.१०) सकाळी सुमारे ७.१५ वाजण्याच्या सुमारास माजलगाव येथील सादोळा चौकात एमएच १६ सीई ७६९९ क्रमांकाचा वाळू वाहतूक करणारा हायवा टिप्पर टायर फुटल्यामुळे रस्त्याच्या कडेला उभा असल्याचे आढळून आले. वाहन दुभाजकाला धडकल्याने दुभाजकाचेही नुकसान झाल्याचे



निदर्शनास आले.

यावेळी हायवा मालक माणिक शेषेराव जाधव (रा. चिंचगव्हाण, ता. माजलगाव, जि. बीड) याने पोलिसांना सदर वाळू जालना जिल्ह्यातील चांगतपुरी येथील अधिकृत टेंडरमधून आणल्याचे सांगून त्यासंदर्भातील रॉयल्टी सादर केली. मात्र पोलिसांनी पडताळणी केली असता ती रॉयल्टी बनावट असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर अधिक चौकशी केली असता संबंधित वाळू हिवरा नदीपात्रातून अवैधरित्या उपसा करून आणण्यात आल्याची कबुली मिळाल्याचे पोलिसांनी सांगितले. यानंतर पोलिसांनी हायवामधील वाळू व वाहन असा एकूण २० लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात माणिक शेषेराव जाधव व हायवा चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२), ३१८(४), ३३८,३३६(४), ३४०(२), ३(५) तसेच सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम ३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हायवा मालकास अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई प्रभारी पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक केरबा माकणे, पोलीस उपनिरीक्षक संदीप राठोड, पोलीस कॉन्स्टेबल महादेव बहिरवाळ व सुनील गवळी यांनी केली.

## विषारी दारूप्रकरणातील संशयिताच्या शोधासाठी सीआयडी पथक रवाना

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील विषारी हातभट्टीची दारू मृत्यू प्रकरणाच्या तपासात गुन्हे अन्वेषण विभागाने (सीआयडी) या रॅकेटमध्ये आणखी सुमारे २० जणांचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त केला आहे. त्यांच्या शोधासाठी सीआयडीने पाच विशेष पथके तयार केली आहेत. पुणे व पिंपरी चिंचवड येथे २६ ते २८ मे या कालावधीत विषारी हातभट्टीची दारू पिल्याने अनेकांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी दापोडी व हडपसर पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले होते. या प्रकरणातील ११ आरोपींना न्यायालयाने १० जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. तपासादरम्यान आरोपींकडून जप्त करण्यात आलेले मोबाइल फोन आणि इतर तांत्रिक पुरावे फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठविण्यात आले असून,




त्यांची क्लोन कॉपीही प्राप्त केली जात आहे.

तसेच सर्व आरोपींच्या सीडीआर आणि आयपीडीआरचे विश्लेषण सुरू आहे. साक्षीदारांचे जबाब नोंदविण्याची प्रक्रिया देखील वेगाने सुरू आहे. दरम्यान, विषारी दारू प्रकरणाबाबत नागरिकांकडे काही माहिती असल्यास ती देण्याचे आवाहन सीआयडीने केले आहे. यासाठी दापोडी आणि हडपसर येथे दोन मदत केंद्रे सुरू करण्यात आली असून, नागरिकांनी पुढे येऊन तपासाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**२० संशयितांच्या मार्गावर सीआयडी**

विषारी दारू प्रकरणात आणखी २० जणांचा सहभाग असल्याचा संशय आहे. त्यामुळेच या संशयितांच्या शोधासाठी पाच विशेष पथके कार्यरत केली गेली आहे. आरोपींचे मोबाईल आणि डिजिटल पुरावे फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. सीडीआर, आयपीडीआरचे विश्लेषण सुरू करण्यात आले आहे. साक्षीदारांचे जबाब नोंदविण्याचे काम वेगात सुरु आहे. नागरिकांकडून माहिती मिळविण्यासाठी दोन मदत केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.

**राज्यात संतापाची लाट**

दुसरीकडे, पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये झालेल्या मृत्यूमुळे सर्वत्र संतापाची लाट पसरली आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये विषारी दारूच्या सेवनाने झालेल्या अनेक मृत्यूंच्या प्रकरणात मोठी कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी योगेश वानखेडे याला अटक करण्यात आली आहे. त्याने रसायने आणि इंडस्ट्रियल स्पिरिट मिसळलेली विषारी दारू पुरवल्याचा त्याच्यावर आरोप आहे, ज्यामुळे अनेक लोकांचा मृत्यू झाला. पोलीस सध्या त्याची चौकशी करत असून संपूर्ण नेटवर्कचा तपास करत आहेत.

## 'तू होतीस म्हणून' पुस्तकाचे प्रकाशन




**नाशिक । प्रतिनिधी**

मा.शशिकला ताई शुक्रचार्य गायकवाड यांच्या ७५ व्या वाढदिवसा निमित्त डोंबेवली येथील स्वयंवर सभागृह येथे प्रा.शुक्रचार्य गायकवाड लिखीत तू होतीस म्हणून या. पुस्तकाचे प्रकाशन दैनिक वृत्तरत्न सम्राट संपादिका आदरनिय निलम बबन कांबळे ताई यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. या प्रसंगी साहित्य क्षेत्रातील, शैक्षणिक आणि कामगार चळवळ अश्या विविध क्षेत्रातील मान्यवरासह गायकवाड कुटूंबातील सदस्य उपस्थित होते.

गायकवाड सरांनी आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर पावलोपावली समर्थपणे साथ देणारी सहचरणी शशिकला गायकवाड यांच्यावर लिहीले आहे. त्यात प्रेरणा आणि त्याग, साथ याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून पुस्तक रुपाने त्यांनी सहचरणीचा गौरव केला आहे. हा सोहळा उपस्थितांना विषेश भावनिक ठरला.

शशिकला गायकवाड यांना शाल पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला व सर्वींनी मनःपुर्वक सदिच्छा व्यक्त केल्या. मान्यवरांनी सदिच्छा पर आ मनोगत व्यक्त केले. निलिमा बबन कांबळे, शुक्रचार्य गायकवाड सर, विद्या. भोरजारे, दिपश्री बलखंडे यांनी भाषण झाले. सुत्रसंचालन संतोष चव्हाण यांनी केले.

# पुण्यातील काँग्रेसमध्ये 'संशयकल्लोळ'; वाद थेट दिल्ली दरबारी!

पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातील विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध झाल्यानंतर आता महाविकास आघाडीतील काँग्रेसमध्ये राजकीय 'संशयकल्लोळ' सुरू झाला आहे. महाविकास आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाला ही जागा देण्यात आली असताना त्यांनी उमेदवारी मागे घेतल्याने काँग्रेसवर नामुष्की ओढावली. त्यावरून पुण्याच्या प्रभारी शहराध्यक्षपदावरून पायउतार व्हावे लागलेले अरविंद शिंदे यांनी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याविरोधात बंड पुकारले आहे. त्यांनी सपकाळ यांची या निवडणुकीतील भूमिका संशयास्पद असल्याची तक्रार काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे करून यांच्याकडे केल्याने काँग्रेसमध्ये वादाची ठिणगी पडली आहे. पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघाच्या विधान परिषदेच्या निवडणुकीच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या दोन्ही 'राष्ट्रवादी'च्या राजकीय खेळीत काँग्रेसला नामुष्की पप्त्करावी लागली. या निवडणुकीत जास्त मते असतानाही काँग्रेसने महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाला उमेदवार उभे करण्याची संधी दिली. या पक्षाचे उमेदवार श्रीकांत पाटील यांनी माघार घेतल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे उमेदवार विक्रम काकडे यांची बिनविरोध निवड झाली. हा निर्णय घेताना काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांशी संवाद न साधता वरिष्ठ पातळीवरून हालचाली झाल्याने पुण्यातील स्थानिक नेत्यांमध्ये नाराजी पसरली आहे. अरविंद शिंदे यांनी ही नाराजी उघडपणे व्यक्त करून राष्ट्रीय अध्यक्षांकडे तक्रार केली आहे. शिंदे यांच्या बंडखोरीला शहराध्यक्ष पद कारणीभूत ठरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. शिंदे हे २०२२ पासून काँग्रेसचे पुणे शहराचे प्रभारी शहराध्यक्ष होते. काँग्रेसने 'संघटन सृजन' मोहीम राबविली. त्यानंतर पूर्णवेळ शहराध्यक्ष म्हणून नेमणूक होईल, अशी शिंदे यांना अपेक्षा होती. मात्र, त्यांना डावलून सपकाळ यांनी पुणे शहरासाठी दोन शहराध्यक्ष नेमण्याचा निर्णय घेतला. पूर्व विभागाच्या शहराध्यक्षपदी प्रशांत जगताप आणि पश्चिम विभागासाठी माजी आमदार दीप्ती चवधरी यांची नेमणूक केली. त्यानंतर शिंदे हे नाराज झाले. आता विधान परिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसवर नामुष्कीची वेळ आल्याची संधी साधत शिंदे यांनी थेट राष्ट्रीय अध्यक्ष खरगे यांना पत्र पाठवून सपकाळ यांच्या चौकशीची मागणी केल्याने काँग्रेसमधील वाद उफाळून आला आहे. शिंदे यांनी खरगे यांना पाठविलेल्या पत्रामध्ये काही प्रश्न विचारले आहेत. भाजपविरुद्ध कडवा संघर्ष करण्याची संधी असताना काँग्रेसला मैदानाबाहेर ठेवण्याचे षडयंत्र कोणी रचले? कोणाच्या दबावाखाली हा निर्णय झाला? कोणत्या नेत्यांनी काँग्रेसच्या हिताशी तडजोड केली? या संपूर्ण प्रक्रियेत काँग्रेसचे नुकसान करून कोणाचा राजकीय फायदा साधला गेला? विधान परिषद निवडणुकीतील घडामोडींची अखिल भारतीय काँग्रेस कमिटीतर्फे उच्चस्तरीय आणि स्वतंत्र चौकशी करण्यात यावी. निर्णय प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्व संबंधित पदाधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून चौकशी अहवाल पक्षश्रेष्ठींसमोर सादर करण्यात यावा. काँग्रेस पक्षाच्या राजकीय हिताला तिलांजली देणाऱ्या आणि कार्यकर्त्यांच्या विश्वासाशी गद्दारी करणाऱ्या व्यक्तींवर कठोर संघटनात्मक कारवाई करण्यात यावी. भविष्यात अशा प्रकारच्या गुप्त राजकीय सौदेबाजीला आळा घालण्यासाठी स्पष्ट पक्षीय धोरण जाहीर करण्यात यावे. शहर काँग्रेसमधील लोकनिर्वाचित प्रतिनिधी, वरिष्ठ माजी आणि विद्यमान पदाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करूनच भविष्यातील महत्त्वाचे राजकीय निर्णय घेण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात यावेत. पुण्यात काँग्रेस पक्षाकडे किमान संघर्ष करण्याएवढे पुरेसे संख्याबळ, प्रभावी संघटनशक्ती आणि भाजपला थेट आव्हान देण्याची क्षमता असताना काँग्रेस पक्षाला निवडणुकीच्या रिंगणातूनच दूर ठेवण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस नेतृत्वाने पुणे शहरातील काँग्रेस, स्थानिक पदाधिकारी, माजी, विद्यमान लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांना अंधारात ठेवून निर्णय घेतले असतील, तर ते संघटनाविरोधी कृत्य आहे. आघाडीच्या नावाखाली काँग्रेसचा पाठिंबा घ्यायचा, काँग्रेसला निवडणुकीपासून दूर ठेवायचे आणि शेवटच्या क्षणी संपूर्ण समीकरण बदलून भाजपला अप्रत्यक्ष लाभ मिळवून द्यायचा, असे चित्र जनमानसात, सामान्य कार्यकर्त्यात निर्माण झाले आहे.

# कारण ते काय करीत आहेत हे त्यांना कळत नाही

आपल्या देशात एक एक परंपरा आहे की, जो सत्य सांगेल ते लोकांना तो व्यक्ती जिवंत असतांना पटत नाही आणि नंतर तो व्यक्ती या जगातून गेल्यावर लोक त्याचे विचार मान्य करतात. आणि मग त्याच्या विचारावर चालण्याचा प्रयत्न करतात यात अनेक आपले संत आहेत, महापुरुष आहेत आणि धर्मसंस्थापक सुद्धा आहेत. चार्वाक याने परखड सत्य आणि वैज्ञानिक दृष्टीकोन सांगितला पण समाजाने त्यांना जिवंत जाळले आणि त्यांचे ग्रंथ सुद्धा जाळले. आज चार्वाक यांचे विचार यावर लोक चर्चा करीत आहेत आणि त्यावर अंमलबजावणी करण्याचा विचार होत आहे. चार्वाकमुळे जगातील अनेक राष्ट्रात आज लोक नास्तिक आणि विज्ञानवादी आणि तर्कवादी होत आहेत. तथागत बुद्धाने देव, आत्मा आणि पुनर्जन्म नाकारला पण त्याकाळात लोकांना ते पटले नाही आणि वैदिक धार्मियांनी त्यांना कट्टर विरोध केला पण आज काय होत आहे तर जग बुद्धाच्या विचाराकडे जग चालले आहे आणि आपल्या देशात सुद्धा अनेक राज्यात स्वखुशीने आणि कोणताही दबाव आणि आर्थिक आमिषे नसतांना लोक बुद्ध धम्माकडे येत आहेत धम्म स्वीकारात आहेत. आज आपल्या अनेक पुरोगामी संत परंपरेचे विचार अनेक सामाजिक संस्था स्वीकारत आहेत आणि त्याचा प्रचार आणि प्रसार करीत आहेत. पण एकेकाळी या संतांना परखड विरोध झाला कांहीना जिवंत समाधी घ्यावी लागली तर संत तुकाराम यांच्या सारख्या संताला जिवंत जलसमाधी दिली आणि लोकांना सांगितले की, त्यांना पुष्पक विमान आले होते आणि ते सदेह वैकुंठाला गेले. पण सत्य वेगळे होते आजच्या हिंदू धर्माला आणि पूर्वीच्या वैदिक धर्माला या पुरोगामी विचारामुळे हादरे बसत होते. आणि त्यामुळे विशिष्ट (ब्राम्हण) लोकांचे हित त्यात असल्यामुळे सर्व लोकांना वेठीस धरून त्यांनी अशा महापुरुष आणि महान संतांना अनेक प्रकारे छळ करून संपविले याचे आज आपल्यला अनेक लिखित पुरावे मिळत आहेत अनेक ग्रंथ त्यावर उपलब्ध आहेत. अशीच एक घटना ख्रिश्चन धर्माबाबत आहे की, ख्रिश्चन धर्माचे संस्थापक येशू ख्रिस्त यांना जेंव्हा क्रुसावर चढवले आणि त्यांना लोकांनी ठार मारण्यापूर्वी त्यांनी जे उदगार काढले ते असे की, पित्या, त्यांना क्षमा कर, कारण ते काय करीत आहेत हे त्यांना कळत नाही. हे येशू ख्रिस्त यांचे वाक्य आजच्या संदर्भात कांही लोकांना लागू पडते जे लोक आज मुळात बहुजन आहेत आणि त्यांना आपल्या देशातील वैदिक धर्माने (आज ते त्याला हिंदू धर्म मानतात) इतके पछाडले आहे की, आज हे बहुजन लोक ज्या आर.एस.एस. च्या प्रभावाखाली आहेत आणि त्यांची बाजू घेत आहेत असे म्हणण्यापेक्षा त्यांच्या विचाराचे वाहक आहेत. आणि हाच मोठा प्रॉब्लेम आहे की, जी संघटना आजपासून अनेक वर्ष झाले आपल्या बहुजन समाजात फुट पाडून राज्य करीत आहेत आणि स्वत: यात बहुजन समाज यात ओबीसी सर्वात जास्त आहे त्यांचे नुकसान जास्त झाले आहे. पण आज सर्वात जास्त मोठा संघ विचाराचा वाहक हा ओबीसी आहे. हे पाहून जास्त वाईट वाटते. आपल्या देशात अनेक वर्षापासून अनेक पुरोगामी संघटना समाजाला सांगतात की, या देशात ब्राम्हण बाहेरून आले आहेत आणि ते आर्य आहेत पण आजच्या लेखाचा हा विषय नाही पण याचबद्दल पुढे हे पुरोगामी लोक म्हणतात की, हे आर्य फक्त ३:५० टक्के आहेत आणि ते त्यांच्या देशातून स्त्रिया सुद्धा घेऊन आले नव्हते. आणि आज आपल्या देशावर राज्य करीत आहेत. आज कोणतेही क्षेत्र घ्या त्यात चांगल्या पदावर ८० टक्क्यापेक्षा जास्त ब्राम्हण आहेत मग प्रशासन, न्यायालय, शिक्षण आणि इतर अनेक महत्वाच्या क्षेत्रात ब्राम्हण जास्त आहेत आणि त्यामुळे संपूर्ण देश त्यांच्या नियंत्रणाखाली आहे असे म्हटले तर काय चुकीचे आहे ? आताच ८ दिवसापूर्वी घडलेली घटना आहे की, आपल्या देशाच्या सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश मा. बी.आर. गवई यांच्या समोर एका वकिलाने बूट फेकला आणि त्यावर तो धमकीवजा बोलला की, सनातन का अपमान नही सहेगा हिन्दुस्थान . या घटनेचा आपण जार थोडा बारकाईने अभ्यास केला तर आपल्या लक्षात येईल की, इथे मनुची विचारधारा काम करीत आहे. आणि त्यांना संपूर्ण सपोर्ट शासन आणि राजकीय शक्ती करीत आहेत. त्याशिवाय एका वकिलाची काय हिंमत आहे की, तो एवढी मोठी घटना करेल पण आज सर्व क्षेत्रात आर.एस.एस. चा प्रभाव आहे आणि त्यांचे अनेक कार्यकर्ते आज महत्वाच्या पदावर बसले आहेत. आज अनेक लोक खाजगीत असे बोलतात की, नविन शिक्षण धोरण आपल्या देशाला अनेक वर्ष मागे नेईल पण समोर बोलायची कोणाची हिंमत नाही. आज देशात अनेक विद्यापीठाचे कुलगुरू हे संघाचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. त्यामुळे संपूर्ण शिक्षण यंत्रणा आज त्यांच्या ताब्यात आहे. आणि शिक्षण हे समाजात परिवर्तन करण्याचे महत्वाचे साधन आहे. आता महत्वाचा प्रश्न आहे की, अनेक आपल्या उच्च शिक्षित लोकांचा असा समज आहे की, या ३:५० टक्के लोकांनी आपल्या देशावर संपूर्ण कब्जा मिळवला आहे आणि त्यांना आपण कसे नियंत्रित करणार किंवा आपला बहुजन समाज कधी सुधारणार आहे. पण यात महत्वाची बाब आपल्या अनेक लोकांना लक्षात येत नाही की, एकटा ब्राम्हण समाज आपल्यावर राज्य करू शकत नाही हे १०० टक्के सत्य आहे मग याचे कारण काय आहे तर आपले सर्वच बहुजन लोक आर .एस.एस. मध्ये त्यांचे स्वयंसेवक नाहीत पण त्यांच्या विचाराचे वाहक मात्र ९० टक्के बहुजन आहोत आणि हेच महत्वाचे कारण आहे की, आपण त्यांचे समाजावरचे नियंत्रण कमी करू शकत नाहीत.

आज समाजात आर .एस.एस. चा अजेंडा जोरात चालू आहे कारण कांही वर्षापूर्वी म्हणजे २०१४ पूर्वी ते इतके सक्रीय नव्हते मग आज कसे झाले ? तर याचे साधे कारण आहे कोणत्याही देशात आणि कोणत्याही काळात एकाद्या कोणत्याही कार्याला किंवा कला , साहित्य आणि एखादी संघटना याला राजकीय सपोर्ट मिळतो आपण पूर्वी त्याला राजाश्रय म्हणत होतो. तो मिळाला की, कोणतेही क्षेत्र वेगाने पुढे जाते आणि आज तेच झाले आहे. आज केंद्र आणि अनेक राज्यात भाजपा म्हणजे त्यांची मातृसंघटना आर .एस.एस. यांची खरी सत्ता आहे. भाजपा फक्त नांवाला आहे आज देशाचे प्रधानमंत्री कोणताही निर्णय हे संघाला विचारल्याशिवाय घेऊ शकत नाहीत आणि मुळात तेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सदस्य आहेत हे जाहीर आहे. आणि मग देशात लोकशाही आहे वगैरे हे आपल्यला फक्त सांगायचे असते मुळात सर्व हुकुमशाही आहे. आणि ती सुद्धा आर .एस.एस सारख्या मुलतत्ववादी संघटनेची आहे. आता याचे कारण काय ? तर साधे कारण आहे की, आज देशात आणि अनके राज्यात जे मंत्री आहेत आमदार आहेत खासदार आहेत ते सर्व संघाचे सदस्य नाहीत पण मुख्य अडचण अशी आहे की, ते संघाचे निर्णय मान्य करतात त्याला विरोध करू शकत नाहीत. कारण त्यांना एक तर काहीतरी घोटाळे केल्यामुळे जेलमध्ये जाण्याची भीती आहे आणि दुसरे त्यांच्या मनात हिंदू धर्म याबद्दल एक वेगळी भावना या आर.एस.एस.ने मागील अनेक वर्षापासून निर्माण केली आहे. आणि त्यामुळे असे अनेक लोक समाजात आहेत की, ते या हिंदू शब्दासाठी जीव द्यायला तयार आहेत आणि अशाच लोकांमुळे आज आपल्या देशाची वाट लागली आहे. म्हणजे यांना कळत काहीच नाही आणि कोणता विचार सुद्धा माहित नाही पण एक माहित आहे की, हिंदू धर्मासाठी आपण काहीपण करायला तयार आहेत आणि म्हणून कोणतेही मोर्चे आंदोलने असले की, आपले बहुजन तरुण रस्त्यावर येतात, भगवे झेंडे घेऊन पण या बहुजन तरुणांना आज रेशीमबागेतील भगवा आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा भगवा यातील फरक समजत नाही. आणि म्हणून हे आक्रोश मोर्चे असतील, कथा असतील आणि कुंभमेळे असतील किंवा कावडयात्रा असतील यात सर्वात पुढे बहुजन तरुण असतात. पण यांना माहित नाही की, त्यांचा फक्त वापर केला जात आहे आणि यात तरुणच नाही तर आमचा उच्च शिक्षित सुद्धा यांच्या मागे आहे. आज अनेक महाविद्यालयातील आणि विद्यापीठातील प्राध्यापक आहेत जे पीएच.डी झालेले आहेत पण त्यांना एखाद्या घटनेची आपण चिकित्सा केली पाहिजे किंवा कोणतीही घटना आपण आपल्या मेंदूने तपासून पहिली पाहिजे एवढी प्राथमिक अट जी एखाद्या संशोधकाला आवश्यक आहे ती सुद्धा ते पाळत नाहीत याचे मोठे आश्चर्य वाटते.

दुसरी एक महत्वाची बाब म्हणजे आपल्या भारतीय संविधानाने आपणास म्हणजे एस.सी, एस.एसटी, एन.टी, ओबीसी, आणि इतर तसेच महिला (ब्राम्हणसुद्धा) यांना अधिकार दिले आणि या हक्क आणि अधिकारांचा वापर करून या सर्वांनी आपली प्रगती केली हे चांगलेच आहे. पण आपल्याला हे संविधान ज्या महामानवाने दिले आहे आणि अनेक आजार असतांना १८-१८ तास अभ्यास करून ते मसुदा समितीचे प्रमुख असणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केले आहे. त्यांना मात्र यापैकी कोणीही लक्षात ठेवत नाहीत, त्यांचा फोटो कधी घरात दिसत नाही (अपवाद सोडले तर) कधी जयंती साजरी करतांना तिथे येत नाहीत, कधी कोणत्या मोर्चात सामील होत नाहीत आणि या कामात सतत आंबेडकरी अनुयायीच पुढे असतात. याचा आपण विचार केला तर आपल्या लक्षात येईल की, आपल्या लोकाना म्हणजे बहुजन समाजाला हेच समजले नाही की, आपला रक्षणकर्ता कोण आहे आणि आपल्या विरोधी कोण आहे. आज सर्व बहुजन समाज म्हणजे जवळ जवळ ९५ टक्के हा आर.एस.एस. च्या विचाराने चालला आहे त्यांना हिंदू धर्म आणि आर. एस.एस. वाले त्यांचे रक्षणकर्ते वाटतात आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कार्य कमी महत्वाचे वाटतात. त्यामुळे असे वाटते की, येशू ख्रिस्त जो म्हणाला होता की, पित्या, त्यांना क्षमा कर, कारण ते काय करीत आहेत हे त्यांना कळत नाही. हे या बहुजन समाजाला बरोबर लागू पडते आहे. आज बहुजन समाज एका चक्रव्युहात अडकला आहे आणि त्यांना आज काय सत्य आणि काय असत्य आहे याचा विचार नाही त्यामुळे ते यांच्या पुढील अनेक पिढयांचे फार मोठे नुकसान करीत आहेत. आज अनेक बहुजन लोक कथा वाचक आणि हिंदू संघटनामध्ये आपली तरुण मुले पाठवत आहेत आणि त्यांना हे फार मोठे कार्य केल्यासारखे वाटत आहे. पण हेच हिंदू संघटनाचे प्रमुख उद्या काही प्रॉब्लेम आला तर हात वर करतील आणि हे मी हवेत बोलत नाही तर जे जे लोक आजपर्यंत आर.एस.एस.मध्ये अनेक वर्ष काम करीत होते म्हणजे ते शाळेत असल्यापासून पण आता आता त्यांना समजले की, हे संघटन आपल्या समाजाच्या कांहीच उपयोगाचे नाही. उलट यांचा ते वापर करीत आहे. आणि त्यामुळे कांही लोक यांनी हे संघटन सोडले आहे आणि आता ते समाजाला जागृत करीत आहेत. मग निदान त्यांचे तरी इतर बहुजन समाजाने ऐकले पाहिजे असे मला वाटते. कारण यांना कोणी आंबेडकरी विचाराचा माणूस सांगत असेल तर यांना ते पटत नाही. पण एक सत्य आहे आणि उद्या सुद्धा ते सत्यच राहणार आहे की, एक सच्चा आंबेडकरी विचाराचा माणूसच या देशाला तारणार आहे. कारण महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर नेपाळ येथील काठमांडू धम्म परिषदेत सांगून गेले की, या देशाला बुद्ध धम्माशिवाय पर्याय नाही. आज बहुजन समाज जे आर. एस. एस.चे काम करीत आहे हे काम म्हणजे आपण शाळेत असतांना एक मराठी विषयात गोष्ट होती शेख चिल्लीची आज ते जे झाड तोडत आहेत पण जे ज्या झाडाच्या फांदीवर बसले आहेत आणि तीच फांदी ते तोडत आहेत उद्या काय होईल हे सांगायला कोण्या तज्ञाची गरज नाही. आता २०२५ ला मराठा समाजाचा मोर्चा निघाला आरक्षण संदर्भात आणि नंतर ओबीसीचा मोर्चा निघाला एका तरी आर.एस.एस. च्या शाखेने यांना कांही मदत केली का ? किंवा रस्त्यात निदान पाणी तरी दिले का ? याचा विचार आज या संघटनेला पाठिंबा देणाऱ्या लोकांनी करायला पाहिजे. उलट बहुजन जर पुढे जात असेल तर त्याला हे विरोध करतात. १९९० ला ओबीसी बाबत आंदोलन चालू असतांना मंडल कमिशनला आणि ओबीसी यांना राखीव जागा मिळू नये म्हणून भाजपाने व्ही.पी. सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला होता. आणि या मंडल कमिशनला विरोध करण्यासाठी यांनी कमंडल काढले म्हणजे राम मंदिरासाठी रथयात्रा काढली आणि यात सुद्धा आमचेच ओबीसी बांधव मोठया प्रमाणावर होते. पण जेंव्हा मंदिर तयार झाले त्यावेळी त्या मंदिरासमोर असणारे अनेक बहुजन दुकानदार बाहेर काढले गेले आणि यापेक्षा महत्वाचे म्हणजे त्या राम मंदिराच्या ïïïï मध्ये एक सुद्धा बहुजन सदस्य नाही याला काय म्हणावे ? याचा अर्थ या आपल्या बहुजन समाजाला फक्त कामापुरता वापर केला जात आहे. आणि आज भारतात अनेक मोठमोठी मंदिरे आहेत पण तामिळनाडू राज्य सोडले तर कोणत्या मंदिरात बहुजन पुजारी आहे ? कारण तिथे सर्व आर्थिक फायदा आहे तिथे बहुजन नाही. आपले अनेक बहुजन तरुण मुले-मुली या मोर्चे, कावडयात्रा ,पदयात्रा आणि सांगली सातारा भागात भिडे याचे सहकारी धारकरी म्हणून आपल्या बहुजन तरुणांचा वापर केला जात आहे हे जास्त गंभीर आहे. आणि हे आपल्या हिताचे आहे की नाही हे ओळखण्याचे साधे सूत्र आहे आपल्याला जे जे आर. एस. एस.वाले एखादे काम सांगतात त्यावेळी आपण एक लक्षात ठेवायचे की, या कार्यात ते त्यांच्या स्वत:च्या मुला-मुलीना कधीच आणत नाहीत. हे आपल्याला रस्त्यावर अनेक आंदोलने करण्यास सांगतील आणि यांची मुले बघा ते एक तर बाहेर देशात चांगले शिक्षण घेत असतात किंवा एखाद्या चांगल्या बिझनेस मध्ये असतात आणि आपली बहुजन तरुण मुले जेंव्हा त्यांचे करिअर घडवायचे आहे तेंव्हा ते शिक्षण सोडून या कार्यात अडकतात आणि एकदा हा उमेदीचा काळ संपला की, मग पुढे कांहीच राहत नाही हे सुरुवातीला ज्यांनी यात काम केले त्यांना विचारा म्हणजे आपल्याला सत्य समजेल. मागील अनेक वर्षापासून या बहुजन समाजाला कधी हिंदुत्व तर कधी राम मंदिर आणि कधी सनातनधर्म अशा अनेक नशेच्या गोळ्या दिल्या जात आहेत आणि या नशेच्या अवस्थेत हे लोक आपल्या पुढील अनेक पिढयांचे भविष्य अंधकारात ढकलत आहेत पण त्यांना हे आज माहित नाही आणि ते ऐकण्याच्या स्थितीत नाहीत. आपण भारताचा सामाजिक इतिहास पहिला असेल की, आपल्या अनेक महापुरुषांनी आपल्या समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न करण्यासाठी त्यांचे संपूर्ण आयुष्य खर्च केले पण या लोकांनी ते सर्व महापुरुष या जगातून निघून गेल्यावर मग त्यांचे विचार आणि कार्य कांही प्रमाणात स्वीकारले आहेत असे आपणास दिसते. उदा: आपण स्त्री शिक्षण घेऊ तर आपल्या देशात स्त्री शिक्षणाची सुरुवात १८४८ साली महात्मा फुले आणि सावित्रीमाई फुले यांनी पुण्यात केली तेंव्हा स्त्री शिकली तर पुरुषाच्या जेवणाच्या ताटात आळ्या पडतात असे आम्हाला सांगितले गेले आणि पुढे काय झाले हेच शिक्षण मग राजर्षी शाहू महाराज त्यांनी पुढे कोल्हापूर संस्थानात सक्तीचे केले आणि पुढे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात आणले. आणि जे या शिक्षणाला प्रखर विरोध करीत होते त्या ब्राम्हण महिला आज शिक्षणात सर्वात पुढे आहेत. याला म्हणतात ब्राम्हणी षडयंत्र आणि हेच आपणास समजले नाही आणि त्यामुळे येशू ख्रिस्त म्हणतात त्याप्रमाणे पित्या, त्यांना क्षमा कर , कारण ते काय करीत आहेत हे त्यांना कळत नाही. हे आपणास सत्य होताना दिसत आहे. पण हे षडयंत्र समजण्याचे महत्वाचे कारण शिक्षण आहे पण हे शिक्षण आपणास नौकरी देणार यापेक्षा आपल्या समाजात वैचारिक पातळी उंचावण्यासाठी आणि समाजात घडणाऱ्या अनेक घटनांची चिकित्सा करण्यासाठी घेतले पाहिजे हे आपणास समजले पाहिजे. आज शिक्षण आणि त्याचा दर्जा इतक्या खालच्या पातळीवर गेला आहे की, त्याचा विचार करून पुढील पिढीची खूप चिंता वाटते. आज अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते केवळ पदव्या मिळवण्यासाठी आणि त्या पदव्या सुद्धा फार गांभीर्याने नाही तर सहज कमीत कमी मेहनत करून मिळवल्या जात आहेत हे फार धोकादायक आहे. प्राध्यापक म्हणतात की, ग्रामीण भागात मुलांना शिक्षणाची सुविधा असली पाहिजे आणि या नांवाखाली अनेक ग्रामीण महाविद्यालयात पदवी तसेच पदव्युत्तर शिक्षणाची आणि संशोधन करण्याची सोय उपलब्ध करून दिली जात आहे. आज पदवी पर्यंत ठिक आहे. पण पदव्युत्तर आणि कहर म्हणजे पीएच.डी सारखे शिक्षण मिळत असेल तर मग त्याचा दर्जा काय असेल ? हा मोठा गंभीर प्रश्न आहे. म्हणजे मी ग्रामीण भागात मुलांना हे सर्व शिक्षण मिळू नये या विचाराचा नाही पण माझे म्हणणे आहे की, ते चांगल्या दर्जाचे असावे आणि ते आज नाही म्हणून याची चिंता मला वाटते आहे. आज ग्रामीण भागात मुलांना जर आपण पदव्युत्तर शिक्षण दिले तर मग त्याचा दर्जा राखला गेला पाहिजे आणि ते होताना दिसत नाही. आज ग्रामीण भागात शिक्षण घेणारी मुले एम.ए. एम.कॉम आणि एम.एस्सी या वर्गाल प्रवेश घेतात पण त्यांचे लेक्चर आणि प्रक्टिकल होत नाहीत आणि शेवटी ते परीक्षा देतात आणि अंतर्गत गुण आज जास्त असल्यामुळे ते पास होतात पण त्यांची गुणवत्ता फार सुमार दर्जाची असते. म्हणजे आपण जर याचा आज गांभीर्याने विचार केला नाही तर पुढील काळात याचे फार गंभीर परिणाम पाह्यला मिळतील. एका महाविद्यालयात मी मुलाखत चालू असतांना सहज गेलो होतो आणि मी पाहिले की, एका उमेदवाराला त्याचा पदव्युत्तर विषय कोणता आहे ? असे विचारले तर त्याला त्या विषयाचे नांव सुद्धा नीट सांगता येत नव्हते तर मग तो उमेदवार पुढे वर्गात काय शिकवणार आहे ? हा मुलभूत प्रश्न आहे. म्हणजे लोकांनी शिक्षणाचा बाजार मांडला आहे. शिक्षण पैसे देऊन, पदवी पैसे देऊन आणि शिक्षकाची नौकरी सुद्धा पैसे देऊन पुढे बढती पैसे देऊन आणि आता तर मी ऐकले आहे की, पेन्शन सुद्धा पैसे देऊन मग काय राहिले आहे या शिक्षणात ? आणि आपण पुन्हा अपेक्षा करतो की, या शिक्षणाने समाजात बदल झाला पाहिजे. कसा होईल जर शिक्षणाचा दर्जाच इतका खाली गेला असेल तर मग अपेक्षा कशी करणार ? हा प्रश्न आहे. यात शासनाची धोरणे, समाज आणि एकूण व्यवस्था जबाबदार आहे. आणि मग अशा दळभद्री शिक्षण व्यवस्थेतून जे तरुण विद्यार्थी तयार होतील त्यांच्याकडून भारत महासत्ता आणि विश्वगुरु होणार आहे अशी अपेक्षा कशी पूर्ण होणार आहे. मग या व्यवस्थेतून तयार होणारे तरुण हे कोणाच्या तरी हातचे बाहुलेच होणार हे निश्चित आहे. आणि हेच या संधीसाधू राजकारणी आणि या ब्राम्हणी व्यवस्थेला अपेक्षित आहे आणि आज तेच होताना दिसत आहे. आज तरुणांचे मेंदू त्यांना वापरण्याची परवानगी नाही तर ते कोणीतरी हायजक केले आहेत. आणि मग अशा मेंदूकडून त्यांना पाहिजे तसे काम करून घेतले जात आहे. त्यामुळे पुन्हा पुन्हा माझ्या मनाला असे वाटते की, येशू ख्रिस्त जे म्हणाला तेच आज आपल्या बहुजन समाजला १०० टक्के लागू पडते की, पित्या, त्यांना क्षमा कर , कारण ते काय करीत आहेत हे त्यांना कळत नाही. आणि आपण अशी अपेक्षा करू या की, पुढील काळात लवकरात लवकर हा आपला बहुजन समाज जागा झाला पाहिजे आणि महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत मा. डॉ. आ.ह . साळुंखे म्हणतात त्याप्रमाणे या बहुजन तरुण आणि इतर लोकांनी एक पक्के लक्षात ठेवावे की, आता आपल्या धडावर आपलेच डोके आहे. आणि मग या डोक्याचा म्हणजे आपल्या मेंदूचा वापर सुद्धा आपणच केला पाहिजे आणि तो वापर आपल्या समाजाला पुढे नेण्यासाठी व्हावा अशी अपेक्षा आहे. पांडुरंग काने या ब्राम्हण विद्वानाने ५५ वर्ष संशोधन करून एक ' धर्मशास्त्राचा इतिहास ' अशा नांवाचे पुस्तक लिहले आहे. आणि या संशोधनात ते बहुजन समाजला गुलाम करण्यासाठी असे लिहतात की, संपूर्ण जग देवाच्या सत्तेखाली आहे, सगळ्या जगावर देवाची सत्ता आहे, देवावर मंत्राची हुकुमत आहे, मंत्र देवापेक्षा मोठे आहेत आणि मंत्र ब्राम्हणाच्या ताब्यात आहेत.

**( संदर्भ : सनातनी ब्राम्हण आणि पुरोगामी ब्राम्हण हे एकाच शरीराच्या दोन भुजा आहेत. : डॉ. बाबासाहेब आंबेडकर , लेखक: डॉ. हरी नरके)**



प्रा.डॉ.आर.जे. इंगोले
मो.नं.९४२३१८०८७६

# समाजाची यशाची व्याख्या आणि तणावग्रस्त तरुणाई

महागडा फोन, मोठा पगार, आलिशान घर, चारचाकी गाडी आणि प्रतिष्ठित नोकरी हीच आजच्या समाजाने यशाची व्याख्या ठरवून दिली आहे. लहानपणापासूनच मुलांच्या मनावर या यशाचे चित्र कोरले जाते. परिणामी स्वतःची आवड, क्षमता आणि स्वप्ने यांना दुय्यम स्थान मिळते. स्पर्धा परीक्षांचे वाढते महत्त्व, पालकांच्या अपेक्षा, समाजाची तुलना आणि आर्थिक सुरक्षिततेची चिंता यामुळे आजची तरुणाई प्रचंड तणावाखाली जगत आहे. यशाच्या मागे धावताना अनेक तरुण स्वतःलाच हरवून बसत आहेत.

आजचे युग स्पर्धेचे युग म्हणून ओळखले जाते.शिक्षण, नोकरी करियर आणि आर्थिक प्रगतीसाठी प्रत्येक क्षेत्रात तीव्र स्पर्धा निर्माण झाली आहे. अनेक विद्यार्थ्यांचे जीवन कोचिंग क्लास, टेस्ट सिरीज आणि अभ्यास यांच्याभोवती फिरत आहे. गएए, छएएढ, णझडउ यांसारख्या परीक्षांसाठी वर्षानुवर्षे मेहनत घेतली जाते.या परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी लाखो युवक-युवती दिवस-रात्र मेहनत घेत असतात.मात्र प्रत्येकाला यश मिळतेच असे नाही. काही विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या, वेळेचा अभाव, सामाजिक दबाव किंवा इतर अनेक कारणांमुळे आपल्या स्वप्नांचा त्याग करावा लागतो.अशा परिस्थितीत समाजाने ठरवून दिलेल्या यशाच्या व्याख्येमुळे तरुणाईवर मानसिक तणावाचे मोठे ओझे निर्माण होत आहे.या प्रक्रियेत त्यांचे छंद, खेळ, कला आणि आनंदाचे क्षण हरवून जातात.पालकांच्या आणि समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी विद्यार्थी सतत धडपडत असतात. प्रत्येक परीक्षेत यश मिळविण्याची सक्ती, गुणांची तुलना आणि अपयशाची भीती यामुळे अनेक तरुण मानसिक तणाव, नैराश्य आणि आत्मविश्वासाच्या कमतरतेला सामोरे जातात.



आज एखाद्या व्यक्तीचे मूल्य तिच्या उत्पन्नावर किंवा पदावर ठरवले जाते. मात्र पैसा मिळाला म्हणजे आनंद मिळेलच असे नाही. आर्थिक यश असूनही अनेक जण मानसिक समाधान, कौटुंबिक आनंद आणि अंतर्मनाची शांतता गमावून बसतात.

ज्या व्यक्तीला चित्रकला, साहित्य, संगीत, क्रीडा किंवा समाजसेवा यांसारख्या क्षेत्रांत करिअर करण्याची इच्छा असते अशा अनेक तरुणांना यात भविष्य नाही असे सांगितले जाते. परिणामी ते स्वतःच्या आवडीचा त्याग करून दुसऱ्यांच्या स्वप्नांचे ओझे वाहू लागतात.

समाज यशस्वी व्यक्तींचा गौरव करतो, पण अपयशी व्यक्तींच्या संघर्षाकडे दुर्लक्ष करतो. त्यामुळे अपयश आले की अनेक तरुण स्वतःला कमी लेखू लागतात. प्रत्यक्षात अपयश ही शिकण्याची आणि अधिक सक्षम होण्याची संधी असते.

यशाची खरी व्याख्या प्रत्येक व्यक्तीसाठी वेगळी असते. केवळ पैसा, पद आणि प्रतिष्ठा यालाच यश मानणे योग्य नाही. ज्या क्षेत्रात व्यक्तीला आनंद, समाधान आणि आत्मिक शांतता मिळते, तेच त्यांच्यासाठी खरे यश असते. त्यामुळे पालक, शिक्षक आणि समाजाने तरुणांच्या आवडीनिवडी समजून घेऊन त्यांना योग्य दिशा देणे आवश्यक आहे. प्रत्येकाला स्वतःचे स्वप्न जगण्याचा अधिकार आहे. कारण आयुष्य केवळ यशस्वी होण्यासाठी नसते, तर समाधानी आणि आनंदी होण्यासाठीही असते. समाजाने यशाची व्याख्या बदलण्याची वेळ आता आली आहे. प्रत्येक व्यक्तीचे यश हे त्याच्या समाधानात, आनंदात आणि स्वप्नपूर्तीत दडलेले असते. पैसा आणि प्रतिष्ठा महत्त्वाची असली तरी मानसिक शांतता, आत्मसंतोष आणि जीवनातील आनंद याहून मोठे यश दुसरे नाही. तरुणांना त्यांच्या क्षमतेनुसार आणि आवडीनुसार वाटचाल करण्याचे स्वातंत्र्य मिळाले, तरच खऱ्या अर्थाने सक्षम, आनंदी आणि सुदृढ समाजाची निर्मिती होईल.

**कु.उर्वशी मनिष संघवी**
**रा मुर्तिजापूर, जि.अकोला**

# तुकाराम मुंढे यांच्यासारखा अधिकारी कितीही प्रामाणिक, कर्तव्यदक्ष आणि धाडसी असला तरी

## त्याच्या पाठीशी उभे राहणे आपल्याला सहज शक्य नाही कारण आपल्या रक्तातच खाबूगिरी भिनली आहे! : अजयकुमार वाघमारे

**पुणे । प्रतिनिधी**

२० लाखांची गाडी घेऊन ५० रुपयांचा टोल वाचवण्यासाठी धडपडणारे आपण..... १ कोटीचा फ्लॅट घेऊन सोसायटीचा ५०० रुपयांचा मेंटेनन्स वाढला तर आंदोलन करणारे आपण... हॉटेलमध्ये ५००० रुपयांचे बिल देणारे, पण जीएसटी टाळण्यासाठी कॅशमध्ये चालेल का? विचारणारे आपण... देवाला हजारो रुपयांचा हार वाहणारे, पण कर भरताना मात्र जीवावर येणारे आपण... पाचशे रुपयांचा मोबाईल कव्हर ऑनलाइन स्वस्त शोधण्यासाठी दोन तास घालवणारे आपण... पण मतदानाच्या दिवशी दोन किलोमीटर जाऊन मतदान करायला कंटाळा करणारे आपण सिग्नल तोडून वेळ वाचवणारे, फूटपाथ वर बाईक चालवणारे आणि अपघात झाला की प्रशासनाला दोष देणारे आपण... रांगेत उभे राहण्याऐवजी ओळख वापरून पुढे जाणारे आपण स्वच्छतेवर भाषण करणारे, पण गाडीची काच उघडून कचरा रस्त्यावर फेकणारे किंवा पिचकारी टाकणारे आपण स्वतःच्या मुलासाठी सर्वोत्तम शिक्षण हवे असते पण शाळेजवळील अतिक्रमण, गुटखा विक्री किंवा भेसळ याविरोधात आवाज उठवत नाही. रुग्णालयात चांगले उपचार हवे असतात पण बनावट औषधांवर कारवाई करणाऱ्यांच्या मागे उभे राहत नाही.



आपल्याला भ्रष्टाचार नको असतो, पण आपले काम लवकर व्हावे म्हणून काहीतरी सेटिंग शोधत असतो. आपल्याला भेसळ नको असते, पण स्वस्तात मस्त मिळाले की गुणवत्ता विसरतो. आपल्याला प्रामाणिक अधिकारी हवा असतो, पण तो नियम सर्वांसाठी सारखे लागू करू लागला की अस्वस्थ होतो. ज्याने बेकायदेशीर बांधकामांवर कारवाई केली तो वाईट... ज्याने अतिक्रमण काढले तो कठोर. ज्याने भेसळखोरांवर धाडी टाकल्या तो प्रसिद्धीखोर... आणि ज्याने काहीच केले नाही तो चांगला अधिकारी! हा आपल्या समाजाचा मोठा विरोधाभास आहे.

तुकाराम मुंढे यांच्यासारखे अधिकारी म्हणजे आरशासारखे असतात. त्यांच्याकडे पाहिले की व्यवस्थेतील दोषांपेक्षा आपले दोष जास्त दिसू लागतात. म्हणून अनेकांना ते खटकतात. भेसळ फक्त दूध, तूप, तेल, मसाले किंवा औषधांमध्ये नाही... भेसळ आपल्या विचारांमध्ये, वागण्यात आणि नागरिक म्हणून असलेल्या जबाबदारीतही शिरली आहे. समाज बदलायचा असेल तर फक्त मुंढे साहेबांची नाही, तर स्वतःचीही मानसिकता बदलावी लागेल. मुंढे साहेबांची २७ वी बदली होऊ नये म्हणून आवाज उठवण्यापेक्षा, आपल्या २७ वाईट सवयी बदलल्या तर समाज अधिक वेगाने बदलेल! कारण देशाला तुकाराम मुंढे यांच्यासारख्या अधिकाऱ्यांची गरज आहेच पण त्याहून जास्त गरज आहे तुकाराम मुंढेंना साथ देणाऱ्या नागरिकांची! जोपर्यंत प्रामाणिक अधिकारी एकटा लढतो आणि स्वार्थी लोक संघटित राहतात, तोपर्यंत बदल कठीण आहे. ज्या दिवशी सज्जन माणसे एकत्र येतील, त्या दिवशी व्यवस्था बदलायला वेळ लागणार नाही.

# केदारेश्वर कारखान्याने माजलगावच्या शेतकऱ्यांचे सहा महिण्यांपासुन थकविले पैसे

## चेअरमन प्रताप ढाकणे यांच्या घरावर मोर्चा काढणार; युवा शेतकरी संघर्ष समितीचा ईशारा

**माजलगाव । प्रतिनिधी**

अहमदनगर जिल्ह्यातील श्री. केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याने शहरासह तालुका परिसरातील अनेक उस उत्पादक शेतक-यांचे मागील सहा महिण्यांपासुन उस बिलाचे पैसे थकविले असुन कारखाना प्रशासन फक्त वेळकाढु धोरण अवलंबवीत असल्याने मात्र शेतकरी आर्थिक अडचणीत आला त्यामुळे या प्रकरणी कारखान्याचे चेअरमन प्रताप ढाकणे यांच्या घरावर मोर्चा काढण्याचा ईशारा युवा शेतकरी संघर्ष समितीने देत आक्रमक पावित्रा घेतला आहे.



श्री. केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याने माजलगाव तालुक्यातील टाकरवण, तालखेड, किट्टी आडगाव, माजलगाव शहर व परिसरातील बहुतांशी शेतक-यांचा उस गाळपास नेला परंतु सहा महिण्यांपासुन एक रूपयाही संबंधित शेतक-यांना दिला नाही. त्यामुळे वरील सर्कलमधील व उस दिलेले शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. खरिपाच्या पेरणीला तरी पैसे मिळतील असे वाटत होते परंतु कारखान्याचे चेअरमन व एमडी रमेश गरजे हे पैसे देण्यास टाळाटाळ व विलंब करत आहेत. त्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. त्यामुळे केदारेश्वर कारखाना चेअरमन व प्रशासनाने माजलगावकरांचा अंत पाहु नये, शेतक-यांचा संयम सुटला असुन पेरणीला पैसे नसल्याने शेतक-यांना खासगी बँक व सावकराच्या दारात जाण्याची वेळ आली आहे. त्यामुळे युवा शेतकरी संघर्ष समिती लवकरच थकीत बिलाबाबत सर्व शेतक-यांची बैठक घेवुन ठोस पाउले उलणार असुन कारखान्याचे चेअरमन अॅड. प्रताप बबनराव ढाकणे यांच्या घरावर शेतक-यांसह मोर्चा काढण्यात येणार असल्याचे युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# तुलसी फॅशन डिझाईन कॉलेजमध्ये नेत्र तपासणी व नेत्रदान शिबिर संपन्न

**५९ विद्यार्थिनींची तपासणी ; ४० विद्यार्थिनींनी भरले नेत्रदान प्रतिज्ञापत्र**

**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक नेत्रदान दिनानिमित्त बुधवार, दि.१० जून रोजी मोफत नेत्र तपासणी व नेत्रदान प्रतिज्ञा नोंदणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. जिल्हा रुग्णालय, बीड यांच्या सहकार्याने झालेल्या या शिबिरात ५९ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून आपली नेत्र तपासणी करून घेतली.



या शिबिरासाठी प्रमुख पाहुण्या व तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून जिल्हा रुग्णालयाच्या नेत्ररोग अधिकारी श्रीमती सुप्रिया गोपाळघरे-मोराळे आणि जिल्हा रुग्णालयाच्या नेत्रदान समुपदेशक श्रीमती सी. एस. गुरव तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे उपस्थित होत्या.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना तज्ज्ञांनी सांगितले की, आपले डोळे मृत्यूनंतरही इतरांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करू शकतात. एका व्यक्तीचे नेत्रदान दोन अंध बांधवांना नवी दृष्टी देऊ शकते. त्यामुळे समाजात नेत्रदानाविषयी असलेले सर्व गैरसमज दूर करून जास्तीत जास्त नागरिकांनी या राष्ट्रीय कार्यात पुढे येणे गरजेचे आहे. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून प्रेरणा घेत यावेळी ४० विद्यार्थिनींनी मृत्यूनंतर नेत्रदानाचा संकल्प करत आपले अधिकृत प्रतिज्ञापत्रही भरून दिले.


या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्या सौ. सय्यद शहाना, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.श्वेता वंजारे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गीतांजली कांबळे यांनी केले, तर आभार प्रा. विद्या अवघडे यांनी मानले.

# लोकहो, यांना लक्षात ठेवा ते तुमच्या आरोग्याशी खेळत आहेत : एस.एम.युसूफ

**बीड । प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासन विभागाची सूत्रे हाती घेताच धडाकेबाज कारवाया करण्याचा लावलेला सपाटा बघून आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या धास्तीने बंद ठेवण्यात आलेले हॉटेल्स, मिठाईची दुकाने, चहाचे हातगाडे, दूध पुडे विकणाऱ्यांना लक्षात ठेवा ते तुमच्या आरोग्याशी खेळत आहेत असे आवाहन मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ यांनी केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे की, वर उल्लेख केलेले अनेक व्यावसायिक इमान-इतबारे व्यवसाय करत नसल्याने त्यांनी मुंढे साहेबांच्या धास्तीने आपआपले व्यवसाय बंद ठेवले आहेत. याचा सरळ अर्थ निघतो की, व्यवसाय करण्याकरिता आवश्यक असलेले निकष ते पाळत नाहीत. अनेक हॉटेल्स मध्ये वापरले जाणारे तेल, दूध आणि अन्य पदार्थ यात गडबड असते तर भरमसाठ संख्येने वाढलेल्या मिठाईच्या दुकानात मिळणारे गोड खाद्यपदार्थ हे खरेच दुधापासून तयार केले जातात का? हा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून अनुत्तरीत आहे. असाच प्रकार मोठ्या संख्येने अतिक्रमणांच्या जागी टाकण्यात आलेल्या चहाच्या हातगाड्यांबाबत आहे. त्यांच्याकडे येणारे दूध हे दूधच असते का? ते स्वच्छतेचे निकष पाळतात का? याबाबतीतही कुणाला गांभीर्य नाही. अशीच अवस्था रस्त्यांवर अतिक्रमण करत थाटात टेबल-खुर्च्या टाकून नाव, गाव नसलेल्या आरसपाणी प्लास्टिक पिशव्यांमध्ये दूध विकणाऱ्या व्यावसायिकांची आहे. तेही दूध म्हणून विकत असलेले तरल पदार्थ नक्की दूधच आहे का? याचेही कुणाला देणे-घेणे असल्याचे दिसत नाही.



हे सर्व व्यवसाय दूध या पदार्थाशी निगडित आहे. पूर्वीच्या काळात जिथे दूध दुभत्याचा व्यवसाय करणारे शेतकरी मोठ्या संख्येने होते. लोकसंख्या माफक होती. तरीसुद्धा गाव-खेडे असो की शहरे, तिथे सकाळच्या नंतर दूध मिळायचे नाही. तेव्हा हॉटेल्स, चहाचे हातगाडे, मिठाईची दुकाने सुद्धा अत्यंत कमी संख्येत होती. अलीकडच्या काळात दूध दुभत्याचा व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत मोठ्या संख्येने घट झाली आहे. शेती करणाऱ्यांच्या संख्येतही घट झाली आहे. लोकसंख्या मात्र भरमसाठ वाढली आहे. हॉटेल्स, मिठाईची दुकाने, चहाचे हात गाडे, दूध पुडे विकणाऱ्यांच्या संख्येत मात्र लक्षणीय वाढ झाली आहे. या सर्व परिस्थितीचा विचार केल्यास प्रश्न पडतो की, या सर्वांसाठी मुख्य घटक पदार्थ असलेले दूध एवढ्या मोठ्या मुबलक प्रमाणात कसे उपलब्ध होऊ लागले? तर यात शंभर टक्के काळेबेरे असल्याची बाब सहज लक्षात येते.

याकडे मात्र ना शासन-प्रशासनाचे लक्ष आहे, ना जनतेचे. व्यवसाय करणारे जिथे जनतेच्या आरोग्याशी खेळत आहेत, तिथे जनता ही दुर्लक्ष करून त्यांना आपल्या आरोग्याशी खेळू देत आहे. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्यासारखा खमक्या अधिकारी या विभागाला मिळताच त्यांनी आपल्या स्टाईलने जेव्हा धडाकेबाज कार्य करायला सुरुवात केली, तेव्हा वर उल्लेख केलेल्या अनेक व्यावसायिकांनी आपले व्यवसाय बंद ठेवून संभाव्य कारवाईतून वाचण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. तेव्हा लोकहो, अशा व्यावसायिकांना लक्षात ठेवा स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्या कारण असे व्यावसायिक तुमच्या आरोग्याशी खेळत आहेत असे आवाहन मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ यांनी केले आहे.

# बीड जिल्हाधिकारी कार्यालय वर होणाऱ्या महामोर्चास लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा : उमेश आवाड

**केज । प्रतिनिधी**

अ ब क ड उप वर्गीकरण आरक्षणाच्या स्मरणार्थ बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर मातंग समाजाचा महामोर्चा येणाऱ्या १६ जूनला धडकणार आहे. बऱ्याच वर्षांपासून मातंग समाज अ ब क ड आरक्षण उप वर्गीकरण करण्यासाठी लढा देत आहे. मातंग समाज हा मागास असून सगळ्या योजनेपासून वंचित राहिलेला समाज आहे. त्या समाजाला मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी. अ ब क ड आरक्षण वर्गीकरणाची गरज आहे. म्हणून मातंग समाज संपूर्ण महाराष्ट्रभर आंदोलने मोर्चे उपोषणे वेगवेगळ्या पद्धतीने करत आहे.



याची दखल सरकारने घेण्यात यावी यासाठी येणाऱ्या १६ तारखेला बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर लाखोंच्या संख्येने महामोर्चाचे करण्यात आलेलं आहे.

हा मोर्चा सकल मातंग समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला आहे. म्हणून मातंग समाजाने याची दखल घेऊन मोर्चाला उपस्थित राहणे गरजेचे आहे. येणाऱ्या काळामध्ये आपल्या लेकराला उच्च पदावर जर पाहायचे असेल तर अ ब क ड उपवर्गीकरण होणे गरजेचे आहे. त्यासाठी तुम्हाला रस्त्यावर आल्याशिवाय पर्याय नाही. आपण आता नाहीत लढलो तर उद्याचा दिवस आपल्या लेकरांसाठी अंधारमय म्हणून येईल. त्यामुळे आपण आता जागी झाले पाहिजे. आपला लढा हा कोण्या जातीच्या विरोधात नाही तर सरकारची आहे. जिल्ह्यातील तमाम मातंग समाजाला मानवी हक्क अभियान चे केज तालुका अध्यक्ष उमेश आवाड यांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

# सौ.मालतीबाई मोताळे यांचे निधन

**माजलगाव । प्रतिनिधी**



येथील गजानन नगर भागातील रहिवासी तथा गजानन महाराजांच्या निस्सीम भक्त सौ.मालतीबाई लक्ष्मीकांतराव मोताळे वय ८५ वर्ष यांचे गुरुवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचावर मंगलनाथ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती लक्ष्मीकांत मोताळे गुरुजी, मुख्याध्यापक किशोर, अनंत, सुनील हे तीन मुले, एक विवाहित मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. महात्मा फुले विद्यालयाचे मुख्याध्यापक किशोर मोताळे व बीड येथील सावरकर विद्यालयाचे कर्मचारी सुनील मोताळे यांच्या त्या आई होत.

सौ.मालतीबाई मोताळे व त्यांचे पती लक्ष्मीकांत मोताळे गुरुजी हे कुटुंब गजानन महाराजांचे निस्सीम भक्त होते. मागील तीस वर्षापासून या भागात असलेल्या गजानन मंदिरात श्री गजानन महाराजांची दररोजची सेवा त्यांच्याकडून घडायची. या कुटुंबाकडून मंदिरात नियमित गजानन महाराजांचे पारायण, हरिपाठ, भजने आदी कार्यक्रम घेण्यात येत असत. सौ मालतीबाई या आपल्या कुटुंबासह गजानन महाराजांची निस्सीम सेवा करत असायच्या, त्यांना देवाज्ञा देखील गुरुवारीच झाली, त्यातही एकादशी व धोंड्याचा महिना हा पर्वकाळ व आहेवपण त्यांना लाभून सदगती मिळाली.

# पुरुषोत्तमपुरीत महाप्रसादाचे आयोजन ; भाविक भक्तांनी उपस्थित राहुन लाभ घ्यावा : उपसभापती श्रीहरी नाना मोरे

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील श्री. क्षेत्र पुरुषोत्तमपुरी येथे पवित्र अधिक मासानिमित्त भगवान पुरुषोत्तमाला नैवेद्य अर्पण करून भाविकांसाठी गेल्या तीस वर्षापासून या महाप्रसादाचे आयोजन श्रीहरी मोरे यांच्या वतीने केले जाते. हा धार्मिक सोहळा दि. १२ जून २०२६ रोजी सकाळी ०७ वाजल्यापासून आपले अगमनापर्यंत आयोजित करण्यात आला असून, परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन याचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादाचे यजमान श्रीहरी नाना मोरे यांच्या वतीने करण्यात आले आहे.



अधिक मास या पावन महिन्यात भगवान विष्णूच्या पुरुषोत्तम स्वरूपाची विशेष पूजा-अर्चा केली जाते. पुरुषोत्तमपुरी येथील प्राचीन आणि जागृत देवस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भगवान पुरुषोत्तम मंदिरात दर अधिक मासात विविध धार्मिक कार्यक्रम, पूजा, भजन-कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन केले जाते. यंदाही अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसाद सोहळ्यात भाविकांना महाप्रसादाचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे पुढाकारातून करण्यात आले आहे.

भगवान पुरुषोत्तमाच्या कृपेचा लाभ घेण्यासाठी तसेच धार्मिक आणि आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव घेण्यासाठी भाविकांनी या महाप्रसाद सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीहरी मोरे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जिजामाता महाविद्यालयांचा हरित संकल्प

## परिसंवाद, वृक्षारोपण आणि पर्यावरण संवर्धनासाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**माजलगाव । प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी आणि जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण जनजागृतीसाठी परिसंवाद व वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करण्यात आले. निसर्गाकडून प्रेरणा : हवामानासाठी आणि आपल्या भविष्यासाठी या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.



कार्यक्रमाची सुरुवात सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगावचे प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ डॉ. वरुणराज तौर यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाने झाली. पृथ्वीच्या जखमांवर उपाय : हवामान कृती म्हणून वृक्षसंवर्धन या विषयावर बोलताना त्यांनी हवामान बदलाच्या वाढत्या संकटावर मात करण्यासाठी वृक्षसंवर्धन आणि नियोजनबद्ध वृक्षारोपणाचे महत्त्व विशद केले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने वृक्षलागवड ही सामाजिक जबाबदारी म्हणून स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले. यानंतर महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी स्थानिक प्रजातींच्या रोपांची लागवड करून पर्यावरण संरक्षणाचा संकल्प केला. परिसर हिरवागार करण्यासोबतच भावी पिढ्यांसाठी शाश्वत पर्यावरण निर्माण करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या कार्यक्रमासाठी माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा श्रीमती मंगला प्रकाश सोळंके, उपाध्यक्षा श्रीमती पल्लवीताई वीरेंद्र सोळंके आणि सचिव श्रीमती नीला देशमुख यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे नियोजन व पर्यवेक्षण जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचे प्राचार्य प्रा. डॉ. पॉलराज एम. (पीटी) यांनी केले. कार्यालय अधीक्षक वाघ सर यांनी प्रशासकीय सहकार्य केले. तसेच प्रवीण कुमार (उपमुख्याध्यापक, जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग), इरफान पठाण सर यांच्यासह दोन्ही महाविद्यालयांतील शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पर्यावरण संवर्धनासाठी केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृतीची जोड देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. वृक्षारोपण आणि पर्यावरण संरक्षणाच्या माध्यमातून हरित, स्वच्छ आणि सुरक्षित भविष्य घडविण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.



बीड: येथील रिपाइंच्या जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात स्थानिक स्वराज्य संस्था लातूर-बीड-धाराशिव मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांचा सत्कार करतांना युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्यासह आ.सुरेश धस, आ.अभिमन्यू पवार, भाजपाचे जिल्हाध्यक्ष देशमुख, राजू जोगदंड, किसन तांगडे, प्रभाकर चांदणे यांच्यासह आदी उपस्थित होते.

# मुख्याध्यापक बबनराव आंधळे यांना मानाचा राज्यस्तरीय 'युवा लोकमित्र समाजरत्न पुरस्कार २०२६' जाहीर!

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या अडीच दशकांपासून बीड जिल्ह्याच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि सहकार क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा आणि धगधगत्या संघर्षाचा ठसा उमटवणारे संत तुकाराम प्राथमिक विद्यालया'चे मुख्याध्यापक प्रा. आश्रुबा (बबनराव) दगडू आंधळे यांना यंदाचा अत्यंत प्रतिष्ठित आणि मानाचा राज्यस्तरीय 'युवा लोकमित्र समाजरत्न पुरस्कार २०२६' जाहीर झाला आहे. 'साप्ताहिक युवा लोकमित्र' वृत्तपत्राच्या ५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून 'युवा लोकमित्र परिवार'च्या उच्चस्तरीय पुरस्कार निवड समितीने प्रा. बबनराव आंधळे यांच्या अष्टपैलू जीवनप्रवासाची दखल घेत या सर्वोच्च पुरस्कारासाठी त्यांची एकमुखाने निवड केली आहे.



ग्रामीण युवक संघटनेच्या माध्यमातून २५ वर्षांपासून गरजू-वंचितांना मदत, रक्तदान शिबिरे, आणि क्रीडा सप्ताहांचे आयोजन करणाऱ्या बबनराव सरांनी २०२५-२०२६ पासून बानेगावात एक ऐतिहासिक उपक्रम सुरू केला आहे. गावात जन्मणाऱ्या प्रत्येक मुलीच्या नावे थेट १०,००० रुपयांची एफ.डी. करून त्यांनी 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'चा नारा प्रत्यक्ष कृतीत आणला आहे. बानेगाव ग्रामपंचायतीमध्ये सन २००० पासून ते आजतागायत सलग ग्रामपंचायत सदस्य म्हणून लोकसेवेत सक्रिय आहेत. गावात कौलेश्वर मंदिराची स्थापना, संत भगवान बाबा सार्वजनिक वाचनालय, नंदीग्राम शेळीमेंढी पालन संस्था आणि जयभवानी महिला दूध संस्थेची स्थापना करून त्यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी दिली आहे.

२० जून रोजी बीडच्या 'ताज पॅलेस'मध्ये गौरव हा दिमाखदार पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, २० जून २०२६ रोजी संध्याकाळी ०६:०० वाजता 'ताज पॅलेस', कादरपुरा, बार्शीनाका, बीड येथे पार पडणार आहे. या कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता आणि प्रशासकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. हा सर्वोच्च समाजरत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल संपूर्ण बीड जिल्ह्यातील शैक्षणिक वर्तुळ, सहकार क्षेत्र, ओबीसी समाज, शेतकरी संघटना आणि बानेगाव ग्रामस्थांकडून प्रा. बबनराव आंधळे यांच्यावर अभिनंदनाचा प्रचंड वर्षाव होत आहे.

# वाढदिवस साजरा न करण्याचा अशोक डक यांचा निर्णय

## स्व.अजितदादा पवार यांच्या निधनाच्या दुःखद पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना आवाहन

**माजलगाव । प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समिती मुंबईचे माजी सभापती तथा कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगावचे संचालक अशोक गोविंदराव डक यांनी १२ जून रोजी असलेला आपला वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

याबाबत प्रसिद्ध केलेल्या पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री लोकनेते अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झाल्याने संपूर्ण महाराष्ट्रासह ते स्वतःही अत्यंत शोकाकुल आहेत. या दुःखद घटनेच्या पार्श्वभूमीवर यंदा वाढदिवस साजरा करणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.



तसेच आपल्या वाढदिवसानिमित्त मित्र, कार्यकर्ते आणि हितचिंतकांनी बॅनर, हार, तुरे, बुके आदींवर कोणताही खर्च करू नये, असे आवाहनही त्यांनी केले आहे. आपल्या सदिच्छा आणि प्रेम हेच कायम पाठिशी राहावे, हीच अपेक्षा असल्याचे त्यांनी नमूद करत सर्वांचे लोकप्रिय असलेले अजित दादा हे वृक्षप्रेमी होते त्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ सर्वांनी वृक्षारोपण करावे असे आवाहन देखील त्यांनी केले आहे. अशोक डक यांच्या या निर्णयाचे विविध स्तरातून स्वागत होत असून, दुःखद प्रसंगी साधेपणा आणि संवेदनशीलतेचा संदेश देणारा हा निर्णय असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# परळीत हिटलरशाहीचा कारभार?

## पत्रकार गृहनिर्माण संस्थेला दिलेली जागा नमो उद्यानासाठी कशी?

### पत्रकारांच्या हक्काच्या ६० गुंठे जागेवर डल्ला टाकण्याचा प्रयत्न; मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्र्यांकडे दाद मागणार : दीपक देशमुख

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी नगरपालिकेच्या कारभारात लोकशाहीपेक्षा हुकूमशाहीचेच वर्चस्व वाढत असल्याचा आरोप करत माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी पत्रकार गृहनिर्माण संस्थेसाठी पूर्वी मंजूर करण्यात आलेल्या जागेवर नमो उद्यान उभारण्याच्या हालचालींवर तीव्र नाराजी व्यक्त केली. पत्रकारांच्या हक्काच्या जागेची प्रशासनाला आठवण करून देण्यासाठी नंदागौळ रोड परिसरातील संबंधित जागेवर प्रतिकात्मक उद्धाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार बालासाहेब कडबाने, प्रकाश सूर्यकर, आत्मलिंग शेटे, धीरज जंगले, बाबा शेख, धनंजय अरबुने, संतोष जुजगर, प्रल्हाद कडुकटले, बालाजी ढगे, सुकेशनी नाईकवाडे, संजीब रॉय, संदीप मस्के, बालाजी जगतकर, गौतम आगळे, पद्माकर भंडारे, नितीन चव्हाण यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते.

**नगराध्यक्षांच्या हितासाठी जागेचा वापर?**

परळीचे विद्यमान नगराध्यक्ष पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांची संबंधित जागेजवळ शेती असल्याचा उल्लेख करत दीपक देशमुख यांनी गंभीर आरोप केला की, नमो उद्यान उभारल्यास परिसरातील जमिनींचे भाव वाढतील आणि त्याचा थेट फायदा काही मोजक्या व्यक्तींना होऊ शकतो. याच उद्देशातून पत्रकार गृहनिर्माण संस्थेसाठी राखीव असलेली ६० गुंठे जागा नमो उद्यान प्रकल्पात समाविष्ट करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

**१५ वर्षांपूर्वीचे आश्वासन धुळीस मिळाले?**

देशमुख म्हणाले की, सुमारे पंधरा वर्षांपूर्वी तत्कालीन विरोधी पक्षनेते तथा विद्यमान आमदार धनंजय मुंडे यांच्या हस्ते सर्व्हे क्रमांक ४२२ मधील ६० गुंठे जागेचे पत्रकार गृहनिर्माण संस्थेसाठी भूमिपूजन करण्यात आले होते. त्या वेळी पत्रकारांना हक्काची जागा उपलब्ध करून देण्याचे




आश्वासन देण्यात आले होते. मात्र आज त्याच जागेवर नमो उद्यान उभारण्याचा प्रस्ताव पुढे आल्याने पत्रकारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

**जागा एकच, योजना मात्र अनेक**

नगरपालिकेच्या मालकीच्या या जागेचा विविध काळात डम्पिंग ग्राउंड, घनकचऱ्यापासून खत निर्मिती प्रकल्प, अग्निशामक दलाचा तळ, न. प.कर्मचारी निवासस्थान, सुशिक्षित बेकार सप्तशृंगी संस्थेला ही हीच जागा,ऑक्सिजन पार्क आणि काही दिवसांनी पत्रकार गृहनिर्माण संस्था अशा विविध योजनांसाठी जागेचा वापर करण्यात आल्याचे माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी निदर्शनास आणून दिले. आता त्याच जागेवर नमो उद्यानाचा प्रस्ताव पुढे आणला जात असल्याने जागा एकच आणि फलक मात्र वेगवेगळे अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याची टीका त्यांनी केली.

**दिवंगत पत्रकारांच्या स्मृतींचा प्रश्न**

पत्रकार गृहनिर्माण संस्थेच्या भूमिपूजनाचे साक्षीदार असलेले ज्येष्ठ पत्रकार प्रेमनाथ कदम, प्रशांत जोशी, दिलीप बदर आणि सतीश बियाणी यांच्यासह अनेक पत्रकार आज हयात नाहीत. त्यांच्या स्मृतींचा सन्मान राखण्यासाठी तरी पत्रकारांसाठी राखीव असलेली जागा पत्रकारांनाच देण्यात यावी, अशी भावनिक मागणी यावेळी करण्यात आली.

**संघर्षाची तयारी**

जोपर्यंत पत्रकार गृहनिर्माण संस्था नियोजित जागेवर प्रत्यक्ष उभी राहत नाही, तोपर्यंत हा संघर्ष सुरू राहील, असा निर्धार व्यक्त करत दीपक देशमुख यांनी लवकरच परळीतील पत्रकार गृहनिर्माण संस्थेचे कार्यकारी मंडळ व पत्रकार, संपादक आणि सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ घेऊन मुंबईत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि गृहनिर्माण मंत्र्यांची, खासदार बजरंग सोनवणे याची भेट घेणार असल्याचे जाहीर केले.

**पत्रकारांवर दबाव टाकल्याचा आरोप**

या कार्यक्रमाला काही पत्रकार अनुपस्थित राहिल्याबाबतही देशमुख यांनी गंभीर आरोप केले. कार्यक्रमात सहभागी झाल्यास जाहिराती बंद केल्या जातील किंवा भविष्यात अडचणी निर्माण केल्या जातील, अशा प्रकारचा दबाव काही पत्रकारांवर टाकण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. पत्रकारांना अशा पद्धतीने गप्प बसविण्याचा प्रयत्न लोकशाहीसाठी घातक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**मराठा भवन प्रकरणाची आठवण**

अलीकडेच मराठा भवनासाठी देण्यात आलेल्या जागेवरून निर्माण झालेल्या वादाचा उल्लेख करत देशमुख यांनी नगरपालिकेच्या जमीन वाटप प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित केले. संबंधित जागेवर श्री दत्त देवस्थान ट्रस्टने आक्षेप घेतल्यानंतर हे प्रकरण चर्चेत आले होते. त्याचप्रमाणे पत्रकार गृहनिर्माण संस्थेच्या जागेबाबतही प्रशासनाने स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात आली.

**पत्रकारांच्या हक्कासाठी लढा कायम**

नोंदणी क्रमांक –क्र–२२८५६ असलेल्या पत्रकार गृहनिर्माण संस्थेसाठी सर्व्हे क्रमांक ४२२ मधील ६० गुंठे जागा कायम राखावी, तिचा विकास करावा आणि पत्रकारांना दिलेले आश्वासन पूर्ण करावे, अशी मागणी या प्रतिकात्मक उद्धाटन सोहळ्यातून करण्यात आली. पत्रकारांच्या हक्काच्या या प्रश्नाला आता नवे राजकीय व सामाजिक परिमाण प्राप्त होत असून येत्या काळात हा विषय अधिक गाजण्याची चिन्हे दिसत आहेत.

---

# आरक्षणावर कुठलाही घाला आम्ही सहन करणार नाहीत!

## बीड ते मुंबई आंबेडकरी समाजाचा पायी लाँग मार्च उपवर्गीकरणाविरोधात रस्त्यावर उतरला जनसागर

**बीड । प्रतिनिधी**

अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाविरोधात राज्यभरातील आंबेडकरी पक्ष, संघटना आणि सामाजिक चळवळींनी निर्णायक लढ्याचा बिगुल फुंकला असून, आरक्षण वाचवा, उपवर्गीकरण हटवा या घोषणांसह बीड ते मुंबई पायी लाँग मार्चला बुधवार (दि.१०) जून रोजी उत्स्फूर्त सुरुवात झाली. हा लाँग मार्च २६ जून रोजी मुंबईत दाखल होणार आहे. निळ्या झेंड्यांचा महासागर, संविधानाच्या संरक्षणाच्या घोषणा आणि शेकडो कार्यकर्त्यांच्या निर्धारामुळे बीड शहरात आंदोलनाचे वातावरण निर्माण झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून निघालेल्या या मार्चमध्ये विविध आंबेडकरी संघटनांचे पदाधिकारी, युवक, महिला, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. हा संघर्ष कोणत्याही समाज किंवा जातीविरोधात



नसून संविधानाने दिलेल्या आरक्षणाच्या हक्काच्या संरक्षणासाठी असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले. मार्चदरम्यान सरकारवर गंभीर आरोप करत आंदोलकांनी सांगितले की, उपवर्गीकरणासाठी स्थापन करण्यात आलेल्या बदर समितीचा अहवाल अद्याप जनतेसमोर न आणता निर्णय प्रक्रिया पुढे नेण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा अहवाल तातडीने सार्वजनिक करावा आणि सर्व संबंधित घटकांना त्यावर अभ्यासपूर्वक मते व हरकती नोंदविण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा, अशी मागणी करण्यात आली. त्यासाठी मुदत ३० ऑगस्टपर्यंत वाढविण्याचाही आग्रह धरण्यात आला.

आंदोलनकर्त्यांनी असा दावाही केला की, समाजातील सर्व घटकांचा व्यापक संवाद न साधता कोणताही निर्णय घेणे सामाजिक तणाव वाढवू शकते. त्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व ५९ घटकांचे प्रतिनिधी, लेखक, साहित्यिक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते आणि समाजनेते यांची संयुक्त समिती स्थापन करून सर्वसमावेशक चर्चा व्हावी, अशी मागणी करण्यात आली.

या लाँग मार्चमध्ये केवळ उपवर्गीकरणाचाच मुद्दा नसून कंत्राटी नोकरभरती, शिक्षणाचे वाढते खासगीकरण, अनुसूचित जाती-जमातींचा अनुशेष, जातनिहाय जनगणना आणि समान व मोफत शिक्षण अशा अनेक प्रश्नांवर सरकारला जाब विचारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. संविधानिक हक्कांवर कोणताही परिणाम होईल, असे वाटल्यास राज्यभर व्यापक लोकआंदोलन उभारण्याचा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला. या पायी लाँग मार्चला बाबुराव पोटभरे यांनी निळा ध्वज दाखवून सुरुवात केली. या मार्चमध्ये सिद्धार्थ शिनगारे, अजय सरवदे, प्रेम कांबळे, धम्मा वाघमारे, आशिष चव्हाण, मायकल वाघमारे, सतीश पायाळ, प्रवीण टाकणखार, रजनीकांत वाघमारे, अरविंद कांबळे, सुनील वाकेकर, दिनकर ओंकार, विजय वाव्हूळ, अशोक कांबळे, सागर संसारे, अशोक कांबळे, मनोज गायकवाड, दादासाहेब शिंदे, राहुल सोनवणे, लखन जोगदंड, विश्वदीप करंजीकर, बलराज दाभाडे, शाम जाधव, संतोष जोगदंड आदी शेकडो आंबेडकरी कार्यकर्ते मार्चमध्ये सहभागी झाले आहेत.

**असा निघाला बीड ते मुंबई पायी लाँग मार्च**

प्रारंभ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, बीड, मार्गक्रमण : बीड जिल्हा : पाली, मांजरसुंभा, वैद्यकीन्ही, पाटोदा, सौताडा, आष्टी, कडा, धानोरा. अहिल्यानगर जिल्हा : अहिल्यानगर, जामखेड, सुपे, शिरूर, पुणे जिल्हा : भीमा कोरेगाव, पुणे, पिंपरी-चिंचवड, तळेगाव दाभाडे, लोणावळा, मुंबई मार्ग : खोपोली, पनवेल, चेंबूर, समारोप : आझाद मैदान, मुंबई.

---

# फडणवीस सरकार मुर्दाबादच्या घोषणांनी पाटोदा दणाणला

## शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या जी.आर.ची होळी

**पाटोदा । प्रतिनिधी**

राज्य शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या विरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेच्या वतीने गुरुवारी पाटोदा येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी शासनाच्या कर्जमुक्ती योजनेच्या जी.आर.ची होळी करून निषेध व्यक्त करण्यात आला. फडणवीस सरकार मुर्दाबाद, शेतकरी विरोधी सरकार हाय हाय, संपूर्ण कर्जमाफी द्या, शेतकरी एकजूट जिंदाबाद अशा जोरदार घोषणांनी परिसर दणाणून गेला.राज्य सरकारने निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात जाहीर करण्यात आलेली कर्जमाफी योजना अपुरी, दिशाभूल करणारी व लाखो शेतकऱ्यांना वंचित ठेवणारी असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. शेतकऱ्यांच्या अपेक्षाभंगामुळे राज्यभर संतापाची लाट



निर्माण झाली असून शासनाने तात्काळ संपूर्ण कर्जमाफी जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली.

किसान सभेचे उपाध्यक्ष कॉ. महादेव नागरगोजे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले. कर्जमाफीवरील अन्यायकारक अटी रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

आंदोलनादरम्यान शासन निर्णयाची प्रतीकात्मक होळी करण्यात आली. घोषणाबाजीमुळे उपविभागीय अधिकारी कार्यालय परिसर आंदोलनमय झाला होता. त्यानंतर मुख्यमंत्री, कृषिमंत्री व जिल्हाधिकारी यांना उद्देशून निवेदन सादर करण्यात आले. यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्ष, किसान सभा, शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकरी हिताचे निर्णय तातडीने न घेतल्यास भविष्यात आणखी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

---

# आरक्षण उपवर्गीकरण विरोधात बीड ते मुंबई पायी लाँग मार्चचे लिंबागणेश येथे जल्लोषात स्वागत : डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाच्या विरोधात आरक्षण वाचवा, उपवर्गीकरण हटवा या घोषणेसह सुरू झालेल्या बीड ते मुंबई पायी लाँग मार्चचे लिंबागणेश येथे गुरुवारी उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. दि.१० जून रोजी बीड येथून प्रारंभ झालेला हा लाँग मार्च २६ जून रोजी मुंबई येथे पोहोचणार आहे. निळ्या झेंड्यांचा महासागर, संविधान संरक्षणाच्या घोषणा आणि शेकडो कार्यकर्त्यांचा निर्धार यामुळे या मार्चकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे. गुरुवारी सकाळी सुमारे ११ वाजता हा मार्च लिंबागणेश येथे दाखल झाला.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज चौकात पायी लाँग मार्चमधील सहभागी आंबेडकरवादी अनुयायांचे आतषबाजी करून स्वागत करण्यात आले. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस



पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच सुवासिनींनी सहभागी भीमसैनिकांचे औक्षण केले. ग्रामपंचायत कार्यालयात सर्व सहभागींसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी सिद्धार्थ शिनगारे, अजय सरवदे, भीमपुत्र प्रेम कांबळे, संदीप जाधव, ज्ञानेश्वर कवठेकर, लखन जोगदंड, धम्मा वाघमारे आदींचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. गणेश ढवळे, भीम टायगर ग्रुपचे जिल्हाध्यक्ष रविबापू निर्मळ आणि बाळासाहेब मोरे पाटील यांनी उपस्थितांना संबोधित करताना आरक्षण वाचविण्यासाठी सुरू असलेल्या या न्याय्य लढ्याला लिंबागणेशसह अठरा पगड जातीतील समाजबांधवांचा पाठिंबा असल्याचे सांगितले. तसेच भविष्यातही या आंदोलनात सर्वतोपरी सक्रिय सहभाग नोंदविण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी राजेभाऊ गिरे, बाळकृष्ण थोरात, सुरेश निर्मळ, अरुण निर्मळ, जितू निर्मळ, औदुंबर नाईकवाडे, लखन राऊत, पप्पू आवसरे, विलास काटे, स्वप्निल निर्मळ आदींसह अनेक कार्यकर्ते पायी लाँग मार्चमध्ये सहभागी झाले होते.

---

# पिंपळा – नगर बसला पिंपळ्याजवळ अपघात, प्रवासी सुखरूप

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील पिंपळा येथे पिंपळा ते नगर कडे जाणाऱ्या बसला अपघात झाला असून बस मधील प्रवाशांसह चालक वाहक सर्व सुखरूप आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहिल्या नगर येथील तारकपुर आगाराची बस (एम. एच. १४ बीटी ३७५० )सकाळी पावणे अकरा वाजता निघून पिंपळा येथे आली त्यानंतर पिंपळा येथून परत अहिल्या नगर कड जात असताना दुपारी पावणे एक वाजण्याच्या सुमारास गावाच्या बाहेर निघाल्यानंतर काही अंतरावर एका दुचाकी स्वाराला वाचवताना बस रस्त्याच्या कडेला असलेल्या



खड्ड्यात गेली व एका बाजुला (अंगावर) पलटी झाली. बसमध्ये मोजकेच प्रवासी होते. चालक, वाहक आणि बसमधील प्रवाशांना कसलीही इजा झाली नाही. घटनेची माहिती समजताच पिंपळा येथील सामाजिक कार्यकर्ते प्रा. दादा विधाते, पत्रकार अशोक कुताळ, प्रदीप भवर, मच्छिंद्र धायगुडे, संतोष शेंडगे, बाळू कावळे, दादा भवर, वर्मा भैया व इतर ग्रामस्थ तातडीने घटनास्थळी जमा झाले व चालक, वाहक आणि बसमधील प्रवाशांना धीर दिला.

---

# योग दिनानिमित्त पाच दिवस मोफत ऑनलाइन योग वेबिनारचे आयोजन : तांबे

**बीड । प्रतिनिधी**



दरवर्षी २१ जून रोजी जागतिक योग दिन साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून योगाचे महत्त्व अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचावे आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश समाजात रुजावा, या उद्देशाने योग शिक्षिका राधा तांबे यांच्यावतीने १५ जून ते २० जून या कालावधीत पाच दिवसांच्या मोफत ऑनलाइन योग वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात वाढता तणाव, बदलती जीवनशैली आणि विविध आरोग्य समस्या लक्षात घेता योगाची गरज अधिक महत्त्वाची ठरत आहे. या वेबिनारमध्ये योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे फायदे, दैनंदिन जीवनात योगाचा समावेश कसा करावा, तसेच प्राणायाम, ध्यान आणि विविध योगासनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. ऑनलाइन स्वरूपात होणाऱ्या या वेबिनारमध्ये विद्यार्थी, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य नागरिकांना घरबसल्या सहभागी होता येणार आहे. जागतिक योग दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या उपक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, तसेच आपल्या कुटुंबीय आणि मित्रपरिवारालाही सहभागी करून घ्यावे, असे आवाहन राधा तांबे यांनी केले आहे. वेबिनारमध्ये सहभागी होण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ९७६५४१००४४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

# हवामानाचा अंदाज घेऊनच सोयाबीन व कापूस लागवड करा : संचालक अमोल जाधव

**माजलगाव । प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांत निसर्गाचे चक्र पूर्णपणे बदलले असून मान्सूनचा पाऊस वेळेवर पडत नाही. कधी सुरुवातीलाच जोरदार पाऊस पडतो तर कधी पेरण्या झाल्यावर मोठा खंड पडतो. अशा बदलत्या आणि अनिश्चित हवामानाचा गांभीर्याने विचार करूनच शेतकऱ्यांनी यंदा घाईघाईने पेरण्या न करता, पावसाचा अंदाज घेऊनच सोयाबीन व कापूस लागवड करावी, असे आवाहन शेती विषयक सामाजिक कार्यकर्ते तथा माजलगाव मार्केट कमिटीचे संचालक अमोल जाधव यांनी केले आहे.

सध्या मान्सूनच्या आगमनाची चर्चा सुरू असली तरी ग्रामीण भागात अजूनही पुरेशा आणि दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. कमी पावसात किंवा केवळ एका मोठ्या पावसावर घाईगडबडीत केलेली पेरणी उलटण्याची मोठी भीती असते. यामुळे बियाणे, खते आणि



मजुरीचा खर्च वाया जाऊन शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते. हाच धोका ओळखून अमोल जाधव यांनी परिसरातील शेतकऱ्यांना काही महत्त्वाचे आणि अभ्यासपूर्ण सल्ले दिले आहेत. जोपर्यंत जमिनीत किमान ७५ ते १०० मिमी (साधारण ४ ते ५ इंच खोल) चांगला पाऊस होऊन जमीन पूर्णपणे ओलत नाही, तोपर्यंत सोयाबीनची पेरणी करू नये. बाजारातून आणलेल्या किंवा घरच्या सोयाबीन बियाण्याची घरच्या घरी उगवण क्षमता तपासूनच पेरणीचा निर्णय घ्यावा. कापूस लागवड करताना जमिनीच्या मगदुराप्रमाणे दोन झाडांमधील आणि ओळींमधील अंतर योग्य ठेवावे, जेणेकरून भविष्यात रोगराईचा प्रादुर्भाव कमी होईल. पेरणी करतानाच रासायनिक खतांचा बेसुमार वापर टाळून, सुरुवातीला गरजेपुरतीच आणि शिफारसीत खते द्यावीत.

पावसाचा अनिश्चितपणा आता आपल्या शेतीचा भाग बनला आहे. अशा वेळी जुन्या पारंपरिक पद्धतीनेच पेरणी करत राहिलो, तर नुकसान ठरलेले आहे. त्यामुळे हवामान खात्याचा अंदाज, जमिनीतील ओलावा आणि ओलिताची सोय पाहूनच सोयाबीन आणि कपाशीचे नियोजन करावे. बळीराजाने कुठल्याही अफवांना बळी न पडता आणि घाई न करता हुशारीने पाऊल उचलावे, असे आवाहन अमोल जाधव यांनी केले. अमोल जाधव यांच्या या समयोचित सल्ल्यामुळे परिसरातील शेतकरी आता अधिक सतर्क झाले असून, त्यांच्या या मार्गदर्शनाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

---

# गणेश चांदगुडे यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र परिवाराकडून शुभेच्छांचा वर्षाव



**आष्टी । प्रतिनिधी**

सय्यदमीर लोणी येथील गणेश चांदगुडे यांचा वाढदिवस नुकताच मित्र परिवाराच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने त्यांच्यावर सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील विविध स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव झाला आहे. वाढदिवसाचे औचित्य साधून गणेश चांदगुडे यांच्या मित्र परिवाराने एकत्र येत त्यांना दीर्घायुष्यासाठी आणि भावी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

वाढदिवसानिमित्त पारंपरिक फेटा परिधान केलेले गणेश चांदगुडे आणि त्यांचे स्नेही एकत्र दिसत असून, सर्वांनी मिळून हा आनंदोत्सव साजरा केला. या प्रसंगी त्यांचे खंदे समर्थक आणि स्नेही बालवीर शिंदे, तुषार वाळके आणि सय्यदमिर लोणी मित्र परिवार प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वांनी गणेशभाऊंना पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या पुढील वाटचालीस व कार्यास शुभेच्छा दिल्या.


---

# धम्मसंस्कार शिबिराचा समारोप: धम्मरॅली आणि धम्मदेसनेने परिसर दुमदुमणार

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील 'यशोधरा बुद्धविहार ट्रस्ट' आणि 'प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था, बीड' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या १० दिवसीय धम्मसंस्कार शिबिराचा सांगता समारंभ आज, शुक्रवार, दिनांक १२ जून २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. या निमित्ताने धम्मरॅली, धम्मदेसना आणि धम्मभोजनदानाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

शिबिराची व्याप्ती आणि विशेष आकर्षण गेल्या १० दिवसांपासून सुरू असलेल्या या शिबिरात माजलगाव शहर आणि परिसरातील एकूण ११० विद्यार्थी-विद्यार्थीनींनी सहभाग नोंदवला होता. या शिबिरात धम्मसंस्कार, पाली भाषा, बुद्ध जीवनी आणि महापुरुषांच्या जीवनचरित्राचे



धडे देण्यात आले. उद्या होणाऱ्या समारोप सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे सकाळी आयोजित केलेली धम्मरॅली, जी यशोधरा बुद्धविहार, डॉ.आंबेडकर चौक ते लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालयापर्यंत काढली जाणार आहे.

समारोप कार्यक्रमाची रूपरेषा (दि. १२ जून २०२६) धम्मरॅली सकाळी (यशोधरा बुद्धविहार ते सुंदरराव सोळंके महाविद्यालय) मुख्य कार्यक्रम सुरुवात सायंकाळी ५:०० वाजता, विद्यार्थी प्रमाणपत्र वाटप सायंकाळी ६:३० वाजता, धम्मदेसना सायंकाळी ७:०० ते ८:३०, भोजनदान रात्री ८:३० वाजता मान्यवरांची उपस्थिती या सोहळ्यासाठी पू. भिक्खू धम्मशील थेरो यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली विविध भिक्खू संघ आणि प्रतिष्ठित मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. यामध्ये उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांसह अनेक स्थानिक पदाधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यशोधरा बुद्धविहार ट्रस्ट व धम्मसंस्कार शिबिर संयोजन समितीने या सोहळ्यासाठी उपस्थित राहून धम्माचा लाभ घेण्याचे आवाहन माजलगावकरांना केले आहे.

दैनिक, **प्रवक्ता लोकशाहीचा** हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **मुजमुले नितीन रावण** यांनी मुद्रक,जगमित्र ऑफसेट,बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै, ता,परळी वै,जि,बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून दैनिक प्रवक्ता लोकशाहीचा कार्यालय, रावण मुजमुले हाऊस नं.८०४, बिल्डींग नं.१९६ कानोबा नगर नाथापूर रोड, न्यू जीवनदीप सिनीयर कॉलेज पिंपळनेर ता.जि.बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील) मो,९६७३२१०४३८ - ई-मेल- pravaktalokshahichagmail. com

The Daily newspaper, Pravakta Lokshahicha, is published by its publisher, owner, and editor, Mujmule Neetin Rawan. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Pravakta Lokshahicha Daily office, S/O RAWAN MUJMULE HOUSE NO. 804,BUILDING NO .196 KANOBA NAGAR NATHAPUR ROAD NEAR JEEVANDEEP SENIOR COLLEGE PIMPALNER TAL.DIST.BEED, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news published in the Daily. The responsibility for selecting the content rests with them as per the PRB Act.) Mobile: 9673210438 - Email: pravaktalokshahicha@gmail. com